MHSN090001131998

| | |
|---|---|
| दाखल तारीख | : २८.१०.१९९८ |
| नोंदणी तारीख | : ०५.११.१९९८ |
| निकाल तारीख | : १७.०८.२०२६ |
| कालावधी | वर्षे महिना दिवस<br>२७ ०९ २० |

## दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव यांचे न्यायालयात

(पिठासन अधिकारी श्रीमती बी.आर.आवचारी दुर्गवडे)

**नियमित दिवाणी दावा क्र.२२९/१९९८**
**निशाणी क्र.**

१) **यशवंत मारूती पाटील (मयत)**

१/१) **श्रीमती लिलाबाई यशवंत पाटील**
वय –७५ वर्षे, धंदा – शेती व घरकाम

१/२) **श्री. चंद्रकांत यशवंत पाटील**
वय –५५ वर्षे, धंदा – शेती

१/३) **श्री. रमेश यशवंत पाटील**
वय –५० वर्षे, धंदा – शेती

१/४) **श्रीमती शोभा यशवंत पाटील**
वय –५० वर्षे, धंदा – घरकाम
वादी क्र.१/१ ते १/४ रा.विटा,
एस.टी.स्टँडचे पाठीमागे विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

१/५) **सौ. आशाताई उत्तम गायकवाड**
वय –४५ वर्षे, धंदा – घरकाम
रा.बलवडी, ता.खानापूर, जि.सांगली.

} ––– वादी

–– विरुध्द ––

१) **दत्तात्रय मारूती पाटील (मयत)**

१अ) **मंगल बाळासाहेब सुर्यवंशी (मयत)**

१अ/१) **श्री. संदीप बाळकृष्ण पाटील**
वय –३६ वर्षे, धंदा – शेती

} –– प्रतिवादी

१अ/२) **सौ. सुजाता जयवंत पाटील**
वय –३८ वर्षे, धंदा – घरकाम

| | | | |
|---|---|---|---|
| १अ/३) | **सौ. दिपाली शिवाजी पाटील**<br>वय –२६ वर्षे, धंदा – घरकाम | } | |
| १अ/४) | **सौ. स्वाती विजय चव्हाण**<br>वय –२६ वर्षे, धंदा – घरकाम<br>प्रतिवादी क्र.१अ/१ ते १अ/४<br>सर्व रा.द्वारा – प्रतिभा निळकंठ धोतरे<br>४६५, गणपती आळी, शाम कमल<br>अपार्टमेंट, पहिला मजला, वाई, ता.वाई,<br>जि.सातारा – ४१५ ८०३ | } | |
| १ब) | **सौ. कमल उत्तम गायकवाड**<br>वय –४५ वर्षे, धंदा – घरकाम<br>रा.पारे, ता.खानापूर, जि.सांगली | } | |
| २) | **सोनाबाई निवृत्ती पवार (मयत)** | } | |
| २अ) | **निवृत्ती भगवान पवार (मयत)** | } | |
| २ब) | **श्री. गणपती निवृत्ती पवार**<br>वय –४४ वर्षे, धंदा – शेती<br>रा.बांबवडे, ता.पलूस, जि.सांगली | } | **–– प्रतिवादी** |
| २क) | **डॉ. सिद्धेश्वर निवृत्ती पवार (मयत)** | } | |
| २क/१) | **सौ. शैलजा रमेश सावंत**<br>वय –३९ वर्षे, धंदा – घरकाम<br>रूम नं.३०४, फ्लोअर नं.३ देवसर पार्क,<br>कोलमेट रोड, ठाणे वेस्ट – ४०० ३०७ | } | |
| २क/२) | **सौ. शितल प्रदीप देसाई**<br>वय –३५ वर्षे, धंदा – घरकाम<br>मु.पो. तारूख, ता.कराड, जि.सातारा | } | |
| २क/३) | **श्री. श्रीराम सिद्धेश्वर पवार**<br>वय –३२ वर्षे, धंदा – शेती<br>रा.बांबवडे, ता.पलूस, जि.सांगली | } | |
| २ड) | **सौ. शकुंतला नानासो पाटील**<br>वय –४२ वर्षे, धंदा – घरकाम<br>रा.पुणदी तर्फ वाळवा, ता.पलूस,<br>जि.सांगली | } | |

| | | | |
|---|---|---|---|
| २इ) | **सौ. मंगल रामचंद्र पाटील**<br>वय –४६ वर्षे, धंदा – घरकाम<br>रा.जाखापूर, ता.कवठेमहांकाळ,<br>जि.सांगली | } | |
| ३) | **श्रीमती राधाबाई महादेव पाटील**<br>वय –५८ वर्षे, धंदा – घरकाम<br>रा.अंजनी, ता.तासगांव, जि.सांगली | } | |
| ४) | **महादेव दत्तात्रय पाटील (मयत)** | } | |
| ४अ) | **श्रीमती शोभा महादेव पाटील**<br>वय –४३ वर्षे, धंदा– काहीही नाही | } | |
| ४ब) | **सतीश महादेव पाटील (मयत)** | } | |
| ४ब/१) | **श्रीमती सुवर्णा सतीश पाटील**<br>वय –२१ वर्षे, धंदा – घरकाम<br>रा.राजापूर, ता.तासगांव, जि.सांगली | } | **–– प्रतिवादी** |
| ४ब/२) | **कु. अनिकेत सतीश पाटील**<br>वय –२ महिने अज्ञान, अ.पा.क.<br>त्याची जवळची इष्टमित्र आई<br>प्रतिवादी क्र.४ब/१, रा.राजापूर,<br>ता.तासगांव, जि.सांगली. | } | |
| ४/क) | **श्री. निवास महादेव पाटील**<br>वय –२१ वर्षे, धंदा – शेती | } | |
| ४/ड) | **कु. पपी महादेव पाटील**<br>वय –२० वर्षे, धंदा – काहीही नाही | } | |
| ४/इ) | **श्री. धनंजय महादेव पाटील**<br>वय –१८ वर्षे, धंदा–काहीही नाही | } | |
| ४/फ) | **रूक्मीणी दत्तात्रय पाटील (मयत)**<br>४/क ते ४/इ रा.राजापूर, ता.तासगांव,<br>जि.सांगली | } | |
| ५) | **श्री. विजय हणमंत पाटील**<br>वय –२९ वर्षे, धंदा – शेती,<br>रा.राजापूर, ता.तासगांव, जि.सांगली | } | |

**दावा वाटप, पृथक कब्जा व दरम्यानचे उत्पन्न मिळणेकरीता**

---

वादींतर्फे विधीज्ञ – श्री.जे.व्ही.चिपाडे
प्रतिवादी क्र.१ तर्फे विधिज्ञ – श्री. व्ही.जे.ताम्हणकर
प्रतिवादी क्र. २अ ते २इ, ३, ४ब/१ व ४ब/२ व ५ यांचेविरूद्ध दावा एकतर्फा चालविणेत आला.
प्रतिवादी क्र. ४अ, ४क ते ४इ तर्फे विधिज्ञ – श्री. एस.टी.पाटील

---

**न्या य नि र्ण य**

(जाहीर दिनांक १७ ऑगस्ट २०२६)

प्रस्तुत दावा वाटप, पृथक कब्जा व दरम्यानचे उत्पन्न मिळणेकरीता दाखल केला आहे.

**वादींचे कथन खालीलप्रमाणे –**

२. मौजे राजापूर, ता.तासगांव, जि.सांगली येथील शेतमिळकती खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | गट क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पैसे) | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १. | ७३० | २ हे.१० आर | ७ रू. ०६ पैसे | – |
| २. | १८६ | ० हे.३३ आर | २ रू. ६२ पैसे | – |
| ३. | १६७ | ० हे.२४ आर | १ रू. ८७ पैसे | ८ आणे |
| ४. | ६२३ | ० हे.०२ आर | ० रू. १२ पैसे | २ आणे |
| ५. | ६२७ | ० हे.११ आर | ० रू. ८७ पैसे | – |
| ६. | ६३१ | ० हे.१५ आर | ० रू. ७२ पैसे | – |
| ७. | ६५८ | ० हे.१२ आर | ० रू. २५ पैसे | सामाईकात ८ आणे |
| ८. | ७३९ | १ हे.२४ आर | ६ रू.४४ पैसे | – |
| ९. | १७४ | ० हे.२० आर | १ रू. ६० पैसे | – |
| १०. | १७५ | ० हे.१८ आर | १ रू. ३१ पैसे | – |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | ३१८ | ० हे.७९ आर | ५ रू. ५६ पैसे | – |
| १२. | ६२८ | ० हे.१० आर | ० रू. ८७ पैसे | – |
| १३. | ७३४/२ | ० हे.३५ आर | ० रू.७५ पैसे | – |
| १४. | ३१९/१० | ० हे.१४ आर | १ रू.१९ पैसे | – |
| १५. | ३१९/११ | ० हे.२० आर | १ रू.५० पैसे | – |
| १६. | १०३१ | २ हे.६३ आर | १३ रू.४४ पैसे | सामाईकात ४ आणे ६ पै. |
| १७. | १८५ | ० हे.३० आर | २ रू.३७ पैसे | – |

येणेप्रमाणे वरनमूद मिळकती, झाडझूड, तालबंधोरा, तदंगभूत वस्तूसह व यातील गट क्र.३१८ मधील चालू पाण्याची विहीर व त्यावरील इलेक्ट्रीक मोटार, पाईपलाईन यामधील सामाईकात पाणी घेण्याच्या हक्कांसह व इजमेंटचे इतर सर्व हक्कांसह ह्या दावामिळकती आहेत. (यापुढे सोयीसाठी वरनमूद दावामिळकतींचा उल्लेख दावामिळकती असा केला आहे).

३. वादी व प्रतिवादींचे पूर्वहक्कदार कृष्णा यांना मारूती व बाबूराव अशी दोन मुले होती. दि.२२.०१.१९५८ रोजी मारूती मयत झाला असून बाबूराव हा देखील मयत आहे. मारूतीची पत्नी हौसाबाई ही सन १९८८ मध्ये मयत झाली आहे. मारूती व हौसाबाई यांना प्रतिवादी क्र.१ व वादी ही दोन मुले व प्रतिवादी क्र.२ व ३ या मुली आहेत. प्रतिवादी क्र.१ हा वादीचा थोरला भाऊ असून प्रतिवादी क्र.२ व ३ या वादीच्या बहिणी आहेत. प्रतिवादी क्र.४ हा प्रतिवादी क्र.१ चा मुलगा असून प्रतिवादी क्र.४ हा वादीचा पुतण्या आहे.

४. दावामिळकती या वादी व प्रतिवादींच्या एकत्र कुंटुंबाच्या मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत. वादी व प्रतिवादींचे अद्याप एकत्र कुटुंब असून त्यांचे एकत्र कुंटुंबाचे शेतजमिनींचे सरसनिरसमानाने वाटप झालेले नाही. सन १९५८ मध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ चे वडील एकत्र कुंटुंबात मयत झाले आहेत.

दावामिळकतींपैकी काही मिळकती वडीलार्जित आहेत. वडील असतांना सुद्धा प्रतिवादी क्र.१ हा व्यवहारकुशल असल्याने तो कुंटुंबाच्या मिळकतींची सर्व व्यवस्था पाहत होता. वडीलार्जित मिळकतींतून येणारे उत्पन्न कुंटुंबास पुरून उरेल असे होते. अन्य कोणाचे कर्जपाणी नव्हते. वडील असतांना प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे विवाह झालेले होते व प्रतिवादी क्र.१ चे नावे एकत्र कुंटुंबाचे उत्पन्नातून मिळकती खरेदी केली होती. ती मिळकत एकत्र कुंटुंबाची म्हणूनच वहिवाटली जात होती. वडील मयत झालेनंतरसुद्धा प्रतिवादी क्र.१ हा थोरला असलेने व व्यवहारचतुर असलेने तोच सर्व मिळकतींची व्यवस्था पाहत होता परंतू पुढे बायकांचे पटेना म्हणून प्रतिवादी क्र.१ ने वादीस एकत्र कुंटुंबाचे मिळकतींपैकी काही मिळकती सोईनुसार वहिवाटणेस दिल्या व त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१ चे सोईनुसार पृथक वहिवाटी सुरू होत्या. परंतू त्यांचेत सरसनिरसमानाने वाटप झालेले नव्हते. प्रतिवादी क्र.१ ने एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून काही मिळकती स्वतःचे नावे व प्रतिवादी क्र.४ चे नावे खरेदी केल्या आहेत परंतू सर्व मिळकती वादी व प्रतिवादी हे एकत्रात वहिवाटीत होते. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची आई एकत्र कुंटुंबीय म्हणूनच मयत झाली. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी वादीला त्यांचे नावे खरेदी असलेल्या व रेकॉर्डसदरी नोंद असलेल्या मिळकतींमध्ये सामाईकात वहिवाट करणेस हरकत सुरू केली म्हणून वादीने प्रतिवादी क्र.१ व ४ यांना नोटीस देऊन दावामिळकतींचे सरसनिरसमानाने वाटप करून मागितले. त्या नोटीसीस प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी खोटी विधाने करून वाटप करून देण्याचे नाकारले व दावामिळकतींचे वाटप झाले आहे अशा तक्रारी सुरू केल्या. त्यामुळे दावामिळकतींचे सरसनिरसमानाने वाटप होऊन वादीचा ३/८ हिस्सा पृथक करून मिळावा व दरम्यानचे उत्पन्न मिळावे याकरीता प्रस्तुत दावा दाखल करणे वादीस भाग पडले.

५. प्रस्तुत दाव्याचे काम चालू असतांना प्रतिवादी क्र.१ ने दावामिळकत गट क्र.१८६ ही प्रतिवादी क्र.५ ला खरेदी दिली. सदरील व्यवहारास वादीची संमती नाही. सदरील मिळकत एकत्र कुंटुंबात खरेदी केलेली

आहे त्यामुळे सदरची खरेदी वादीवर बंधनकारक नाही त्यामुळे प्रस्तुत दावेचे कामी कोणताही तांत्रिक दोष राहू नये म्हणून प्रतिवादी क्र.५ ला सामील केले आहे.

६. प्रतिवादी क्र. २अ ते २इ, ३, ४ब/१ व ४ब/२ व ५ यांचेविरूद्ध दावा एकतर्फा चालविणेत आला. प्रतिवादी क्र.१ ने कैफियत (नि.३९) दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.१ ने कैफियत (नि.३९) मध्ये असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावा मान्य व कबूल नाही. वादी व प्रतिवादींचे एकत्र कुंटुंब ब–याच वर्षांपासून अस्तित्वात नाही. वंशावळ सर्वसाधारणपणे बरोबर आहे. वडीलार्जित जमिनी या संपूर्ण जिरायत, माळरानाच्या व हलक्या प्रतीच्या होत्या त्यातून पोटाला पुरेल इतकेसुद्धा उत्पन्न येत नव्हते व त्यातून कुंटुंबाचा चरितार्थ चालविणे देखील मयत मारूती यास अशक्य झाले होते त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ला शाळा सोडून श्री. महादेव पांडुरंग साळुंखे, रा. पारे यांचेकडे उपजिवीकेसाठी चाकरी करावी लागली. त्यावेळी प्रतिवादी क्र.१ चे वय १३ वर्षे होते. प्रतिवादी क्र.१ ने सुमारे १२ वर्षे श्री. साळुंखे यांचेकडे नोकरी केली व नोकरी करीत असतांना मिळविलेल्या, साठविलेल्या रकमेतून व मालक साळुंखे यांच्या साहाय्याने दावामिळकत गट क्र.३१८ पूर्वीचा सर्वे क्र.५८/१ ही मिळकत वडीलांच्या हयातीत सन १९४५ साली स्वतःचे कमाईने खरेदी केली व त्यावेळेपासून सदरील मिळकत प्रतिवादी क्र.१ हा एकटाच स्वतंत्र मालकीहक्काने कब्जेवहिवाटी करीत आला आहे. सदरील मिळकत प्रतिवादी क्र.१ ची स्वकष्टार्जित व स्वसंपादित स्वतंत्र मालकीची मिळकत आहे. त्या जमिनीत मयत वडील मारूती, वादी अगर कुंटुंबातील इतर कोणाचाही केव्हाही हक्कसंबंध नाही. ही बाब विचारात घेता सदरील मिळकत वाटपास पात्र नाही. या वस्तुस्थितीची माहिती व ज्ञान असूनही वादीने खोडसाळपणे सदरील मिळकत एकत्र कुंटुंबाच्या उत्पन्नातून खरेदी केलेली होती व ती मिळकत एकत्र कुंटुंबाची म्हणून वहिवाटली जात होती असे खोटे व लबाड कथन केले आहे. सदरील मिळकत एकत्र कुंटुंबाची म्हणून केव्हाही वहिवाटली जात नव्हती.

७. वादी व प्रतिवादी क्र.१ चे वडील मारूती कृष्णा पाटील हे सन

१९५८ साली मयत झाले. मारूती कृष्णा पाटील यांना वादी व प्रतिवादी क्र.१ हे मुलगे, हौसाबाई ही पत्नी, प्रतिवादी क्र.२ व ३ या मुली वारस होत्या. पत्नी हौसाबाई हिला तिचे हयातीत वादी व प्रतिवादी यांनी सांभाळावे व तिची देखभाल करावी असे ठरले. वादी लहान असलेमुळे पत्नी हौसाबाई वादीकडे राहू लागली त्यामुळे मारूतीचे पश्चात पत्नी हौसाबाई हिला मिळणारा वारसाहिस्सा तिने वादी व प्रतिवादी क्र.१ यांना सोडून दिला. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.२ व ३ या बहिणींनी त्यांना मिळणारा वारसाहिस्सा वादी व प्रतिवादी क्र.१ या बंधूंना सोडून दिला. त्यामुळे वडीलार्जित जमिनीचे रेकॉर्ड ऑफ राईट्सला वादी व प्रतिवादी क्र.१ ची नावे प्रत्येकी ८ आणे हिश्याने दाखल झाली. सन १९६२ चे सुमारास वादी व प्रतिवादी क्र.१ यांनी वडीलार्जित जमिनी म्हणजेच पूर्वीचे सर्वे क्र.१४०/२, १४२/१, १४२/३, १४२/५, १४६/१०, १४२/४, १४६/२ व १४६/६ या मिळकतींचे व घरमिळकतींचे आपसांत वाटप करून घेतले व विहीरीचा वसला व पडजागा सामाईकात ठेवल्या. त्यावेळेपासून वादी व प्रतिवादी क्र.१ यांची प्रत्येकाची ज्याचे त्याचे हिश्यास आलेल्या जमिनी निम्म्या हिश्याने स्वतंत्र वहिवाट सुरू झाली.

८. अशाप्रकारे पृथक वहिवाटी सुरू झालेनंतर राजापूर गावी तुकडेबंदी तुकडेजोड कायद्याखाली एकत्रीकरण योजनेचा अंमल सुरू झाला व त्यात सलगतेच्या दृष्टीने नवीन गट तयार करणेत आले. प्रतिवादी क्र.१ चे हिश्यास गेलेल्या जमिनीस म्हणजेच गट क्र.७३० व ६२८ या जमिनींच्या रेकॉर्डला प्रतिवादी क्र.१ चे नाव दाखल झाले. वादीच्या हिश्येस गेलेल्या जमिनीस गट क्र. ७३९ व ६२७ ला वादीचे नाव दाखल झाले व सामाईकातील जमिनींना गट क्र.६३१ व ६५८ देण्यात आला. वरनमूद केलेप्रमाणे वडीलार्जित जमिनीचे सरसनिरसमानाने वाटप झाले असून वादी व प्रतिवादी क्र.१ ला त्यांचे प्रत्येकाचे हिश्यास साधारणतः समान आकाराची जमीन दिली गेली. गट क्र.७३९ ही जमीन चांगल्या प्रतीची व पिकाऊ असलेने ती आपणांस मिळावी याचा वादीने आग्रह धरला. त्यामुळे सदरील गटाची जमीन त्याचे हिश्यास घालण्यात आली. मात्र गट

क्र.७३० चे क्षेत्र जास्त असलेतरी ती जमीन माळरानाची व हलक्या प्रतीची असल्याने त्याचे क्षेत्र जरी जास्त असलेतरी प्रतिवादी क्र.१ चे हिश्यास दिली. याप्रमाणे सरसनिरसमानाने वाटप दोन्ही बंधूंना सारख्या आकाराच्या जमिनी वाटपामध्ये त्यांचे हिश्येस घालण्यात आल्या. वरील बाबी विचारात घेता वडीलांचे पश्चात वडीलार्जित जमिनीचे वाटपानंतर एकत्र कुटुंबच अस्तित्वात राहिले नाही. यास्तव वादी व प्रतिवादींचे दरम्यान झालेल्या वाटपामुळे प्रस्तुत वाटपाचा दावा चालण्यास पात्र नाही.

९. झालेल्या वाटपाचा अंमल होऊन प्रत्येकाची पृथक वहिवाट व स्वतंत्र मालकीहक्काने झाल्याने प्रतिवादी क्र.१ ने त्याची गट क्र.७३० ची मिळकत भूविकास बँकेस तारण देऊन त्यावर कर्ज काढले होते व त्या कर्जाची संपूर्ण परतफेड प्रतिवादी क्र.१ ने एकट्याने केली आहे. वरनमूद केल्याप्रमाणे सरसनिरसमानाने वाटप होऊन पृथक वहिवाटी सुरू झाल्या. न होऊन वादी म्हणतो त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१ च्या सोईनुसार पृथक वहिवाटी सुरू होत्या. त्यांचेत सरसनिरसमानाने वाटप झालेले नव्हते असे वादीचे म्हणणे खोटे व लबाडीचे आहे.

१०. प्रतिवादी क्र.१ ने कुटुंबाच्या उत्पन्नातून काही मिळकतीचे स्वतःचे नावे व प्रतिवादी क्र.४ चे नावे खरेदी केले आहे हे खोटे आहे. वरनमूद केलेप्रमाणे झालेल्या वाटपानंतर एकत्र कुटुंब अस्तित्वात राहिलेले नाही. त्याचप्रमाणे सर्व मिळकती वादी व प्रतिवादी हे एकत्रित वहिवाटीत होते हे खोटे आहे.

११. प्रतिवादी क्र.१ ची स्वसंपादित मालकीची मिळकत गट क्र.३१८ ही मिळकत येसाजी पाटील पाणीपुरवठा योजनेखाली आली व ती संपूर्ण बागायत झाली. या योजनेसाठी प्रतिवादी क्र.१ ने भूविकास बँकेचे कर्ज घेतले होते. सन १९६८-६९ पासून प्रतिवादी क्र.१ हा कायमपणे त्या मिळकतीत उसाचे पिक घेत आला आहे व त्याचे उत्पन्न देखील एकटाच घेत आला आहे. येसाजी पाटील पाणीपुरवठ्याचे पाणी कमी आलेनंतर प्रतिवादी क्र.१ ने स्वखर्चाने त्यात विहीर पाडली आहे. सुदैवाने त्यास भरपूर पाणी आहे. सन १९६८-६९ पासून सदरील

मिळकत बागायत आहे.

१२. दावामिळकत गट क्र.७३४/२ ही ३५ गुंठे जमीन प्रतिवादी क्र.१ ने स्वतःचे उत्पन्नातून सन १९६९ साली कोंडाबाई हिंदूराव पाटील हिचेकडून र.रू.५००/– चे मोबदल्यात खरेदी घेतली व ती जमीन प्रतिवादी क्र.१ च्या स्वतंत्र खरेदी मालकीवहिवाटीची आहे. त्यावेळेपासून प्रतिवादी क्र.१ कडे मालकीहक्काने स्वतःची एकट्याची वहिवाट आहे. साठविलेल्या रकमेतून व भरीव रक्कम सासूबाई हिराबाई सुबराव काटकर व आपला साडू लक्ष्मण गणपती काळे यांचेकडून काही रक्कम उसनवार घेऊन दि.१०.१२.१९८२ चे दोन स्वतंत्र खरेदीपत्राने गट क्र.१८६ क्षेत्र ० हे. ३३ आर व गट क्र.१६७ पैकी ८ आणे हिश्याची जमीन क्षेत्र १२ गुंठे अशा दोन जमिनी प्रतिवादी क्र.१ ने खरेदी केल्या. या दोन्हीही जमिनी प्रतिवादी क्र.१ च्या स्वतंत्र मालकी खरेदी वहिवाटीच्या मिळकती आहेत. खरेदी तारखेपासून सदरील मिळकतींमध्ये प्रतिवादी क्र.१ हा स्वतंत्र एकटाच मालकीहक्काने कब्जेवहिवाट करीत आहे.

१३. त्यानंतर आरफळ धरणासाठी राजापूर येथील ज्यांचेकडे पाच एकरापेक्षा जमीन जास्त आहे त्यांच्या काही जमिनी धरणग्रस्त लोकांसाठी संपादन करणेची योजना होती. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने त्याचे नावावरील गट क्र.३१८, ७३४/२, ६२८ व ६३१ चे मिळकतींचे रेकॉर्ड ऑफ राईट्सला प्रतिवादी क्र.४ चे नाव वर्दी देऊन दाखल केले. त्यावेळेपासून प्रतिवादी क्र.४ हा एकटाच सदरील मिळकती मालकीहक्काने वहिवाटीत आहे.

१४. प्रतिवादी क्र.४ हा प्रतिवादी क्र.१ चा मुलगा आहे. सन १९७५ पासून प्रतिवादी क्र.४ हा एर्नाकुलम, कालीकत व कोट्यायम, केरळ येथील श्री. प्रतापशेठ यांच्या सिल्व्हर रिफायनरीमध्ये नोकरी करू लागला व तेथे त्यांनी सुमारे बरीच वर्षे नोकरी केली. त्या नोकरीच्या पगारातून व साठविलेल्या रकमेतून तसेच श्री. प्रतापशेठ यांच्या साहाय्याने व सासुरवाडीकडून काही आर्थिक मदत मिळवून दावामिळकत गट क्र.१७५, ३१९/१०, ३१९/११, १०३१ पैकी हिस्सा व गट क्र.१७५ या मिळकती खरेदी केल्या. त्या मिळकती प्रतिवादी क्र.४

चे स्वतंत्र मालकीवहिवाटीच्या मिळकती आहेत व त्यात प्रतिवादी क्र.४ हा स्वतंत्रपणे मालकीहक्काने एकटाच वहिवाट करीत आहे. सदरील मिळकतींची वादी अगर प्रतिवादी क्र.१ चा काहीही संबंध नाही. त्यामुळे सदरील मिळकती वाटपास पात्र नाही.

१५. वादीने दिलेल्या नोटीसीस प्रतिवादी क्र.१ तर्फे ख–या वस्तुस्थितीचे उत्तर दिले आहे. दाव्यास कारण घडलेले नाही. एकदा वडीलार्जित मिळकतींचे वाटप होऊन गेल्यामुळे व त्यानंतर एकत्र कुटुंब अस्तित्वात राहिले नसल्यामुळे वादीचा वाटपाचा दावा चालू शकत नाही व तो रद्द होणेस पात्र आहे. प्रस्तुत दाव्यास मुदतीचा बाध आहे.

१६. प्रतिवादी क्र.४ ने कैफियत (नि.४०) दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.४अ ने प्रतिवादी क्र.४ ची कैफियत (नि.४०) ही पुरशीस (नि.५८) ने स्विकारली आहे. प्रतिवादी क्र. ४ब/१ व ४ब/२ यांचेविरूद्ध दावा एकतर्फा चालविणेत आला. प्रतिवादी क्र.४क ते ४ड ने कैफियत दिलेली नाही अगर प्रतिवादी क्र.४ ची कैफियत (नि.४०) ही स्विकारली नाही.

१७. प्रतिवादी क्र.४ ने असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावा मान्य व कबुल नाही. दावामिळकत गट क्र.१७४, १७५, ३१९/१०, ३१९/११ व १०३१ पैकी चार आणे हिस्सा व गट क्र.१८५ या मिळकती कधीही एकत्र कुटुंबाच्या मालकीच्या मिळकती नव्हत्या. सदरील मिळकती या प्रतिवादी क्र. ४ च्या स्वकष्टार्जित व स्वसंपादित स्वतंत्र मालकीच्या असून त्या प्रतिवादी क्र.४ ने नोकरीच्या पगाराच्या उत्पन्नातून खरेदी केलेल्या आहेत. सदरील मिळकतींशी वादी अगर इतर प्रतिवादींचा काहीही संबंध नाही. याची माहिती व ज्ञान वादीला असून वादीने सदरील मिळकती खोडसाळपणे निष्कारण वाटपाचे दाव्यात समाविष्ट केलेल्या आहेत व प्रतिवादी क्र.४ ला निष्कारण प्रतिवादीत सामील केले आहे. वरनमूद मिळकती खरेदी तारखेपासून प्रतिवादी क्र.४ चे एकट्याचे कब्जेवहिवाटीस आहे व प्रतिवादी क्र.४ हा एकटा सदरील मिळकती खरेदी तारखेपासून मालक नात्याने वहिवाटीत आहे.

१८. प्रतिवादी क्र.४ हा सन १९७४–७५ सालापासून गाव सोडून एर्नाकुलम येथे श्री. प्रतापशेठ यांचेकडे नोकरी करू लागला. प्रतिवादी क्र.४ ने कोट्यायम, त्रिचूर व कालीकत येथे श्री. प्रतापशेठ यांचे दुकानात सिल्व्हर रिफायनरीमध्ये नोकरी केली आहे. अशी नोकरी त्याने सुमारे सन १९८४–८५ अखेर १० वर्षे केली आहे. अशा नोकरीचे पगाराचे उत्पन्नातून व सासूरवाडीकडून घेतलेल्या पैशातून त्याने प्रथम गट क्र.१७४ व १७५ या बागायती जमिनी खरेदी केल्या. त्यानंतर गट क्र. ३१९/१० व ३१९/११ या बागायती जमिनी खरेदी केल्या. त्यानंतर गट क्र.१०३१ व १८५ या बागायती जमिनी खरेदी केल्या आहेत. वरीलप्रमाणे जमिनी प्रतिवादी क्र.४ ने स्वतःचे कमाईतून खरेदी केल्या असल्याने त्या प्रतिवादी क्र.४ च्या स्वतंत्र मालकीच्या असून वाटपास पात्र नाही. त्यामुळे सदरील मिळकतींबाबत वादीचा वाटपाचा दावा रद्द होणेस पात्र आहे.

१९. सदरील जमिनी खरेदी केलेनंतर जमिनींचे रेकॉर्ड ऑफ राईट्समध्ये मालकसदरी प्रतिवादी क्र. ४ चे एकट्याचे नाव नोंद झाले व त्या जमिनी प्रतिवादी क्र.४ हा एकटाच कसत आला आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र.४ चे वडील प्रतिवादी क्र.१ व चुलते वादी यांची सामाईकात कधीच वहिवाट नव्हती. सदरील जमिनीत वादीस व इतर कोणासही हिस्सा मागण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार नाही.

२०. वादी व प्रतिवादी क्र.१ हे दोन्ही बंधू ब–याच वर्षापासून मनाने व कृतीने विभक्त झाले व त्यांनी वडीलार्जित मिळकतींचे म्हणजे शेतजमिनी व घरमिळकतींचे वाटप करून घेतले. त्यामुळे त्यांचे एकत्र कुटुंब ब–याच वर्षापासून म्हणजेच ३५ वर्षापेक्षा अधिक काळापासून अस्तित्वात नाही.

२१. वादीचे मुलगे चंद्रकांत व रमेश हे देखील केरळमध्ये कालिकत येथे धंदा करीत होते. त्यापैकी चंद्रकांत याने विटा येथे ८ आर क्षेत्राचा प्लॉट खरेदी केला आहे. तसेच वादीने वाटपात त्याचे हिश्यास आलेल्या राजापूर येथील घरमिळकतीचे भागावर लाखो रूपये खर्च करून घर बांधले आहे.

२२. वादीन जाणूनबुजून खोडसाळपणे घरमिळकतींचा म्हणजेच घरजागेचा उल्लेख दाव्यात केलेला नाही त्यामुळे दावा सदोष आहे. संपूर्ण

वडीलार्जित मिळकती दाव्यात सामील केल्याशिवाय वादीचा वाटपाचा दावा चालू शकत नाही.

२३. प्रतिवादी क्र. ४ चे चुलते वादी व वडील प्रतिवादी क्र. १ यांचेदरम्यान ब–याच वर्षापूर्वी वडीलार्जित शेतजमिनी व घरमिळकतींचे वाटप झाले आहे. त्या वाटपात प्रतिवादी क्र.१ चे हिश्यास गट क्र.७३० व ६२८ या दोन जमिनी आल्या. वादीचे हिश्यास गट क्र.७३९ व ६२७ या जमिनी आल्या व विहीरीचा वसला गट क्र.६३१ व पडजागा ६५८ या सामाईकात ठेवण्यात आल्या. प्रतिवादी क्र.१ ने स्वकष्टाने मिळविलेल्या जमिनीपैकी त्याच्या स्वतंत्र मालकीच्या व वहिवाटीच्या जमिनी म्हणजेच गट क्र.३१८, ७३४/२, ६२८ व ६३१ या जमिनींचा वर्दी देऊन प्रतिवादी क्र. ४ चे नाव दाखल करून दिले व त्या वेळेपासून सदरील जमिनी प्रतिवादी क्र.४ हा एकटाचा स्वतंत्रपणे, मालकीहक्काने व उघडरित्या गेल्या १२ वर्षापासून अधिक काळ वहिवाटीत असलेने तो गैरहक्काने सदरील जमिनींचा मालक झाला आहे असे प्रतिवादी क्र.४ चे वैकल्पीक म्हणणे आहे. गट क्र.६५८ पैकी प्रतिवादी क्र.१ चे ४ आणे हिश्यास व गट क्र.६२३ या विहीरीच्या वसल्यापैकी १ आणे हिश्यास प्रतिवादी क्र.४ चे नाव दाखल करून दिले आहे.

२४. गट क्र.६२३ हा विहीरीचा वसा आहे व त्यात अनेक सामाईक हिस्सेदार आहे. त्याप्रमाणे गट क्र.६५८ या जमिनीत वादी व प्रतिवादींचे शिवाय अनेक हिस्सेदार आहेत. त्या सामाईक हिस्सेदारांना वादीने पक्षकार केलेले नाही. सदरील दाव्यास Non - joinder of necessary parties चा बाध येतो.

२५. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी मुद्दे (नि.४१) काढले आहेत. सदरील मुद्दे, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी शाबीत करतो का, दावामिळकती या त्याचे व प्रतिवादींचे एकत्र कुंटुंबाचे मिळकती आहेत? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| २. | प्रतिवादी क्र.१ शाबीत करतो का, दावामिळकत गट क्र.१८६, १६७, ३१८ व ७३४ हया त्याचे स्वकष्टार्जित मिळकती आहेत ? | **होकारार्थी** |
| ३. | प्रतिवादी क्र.१ व ४ शाबीत करतात का, दावामिळकत गट क्र.१७५, १७४, ३१९/१०, ३१९/११, १०३१ व १८५ हया प्रतिवादी क्र.४ चे स्वकष्टार्जित मिळकती आहेत? | **होकारार्थी** |
| ४. | प्रतिवादी क्र. १ शाबीत करतो का , सन १९६२ मध्ये त्याचे व वादी यांचेत वडीलार्जित एकत्र कुंटुंबाच्या मिळकतींचे वाटप झाले असून त्याला व वादीला प्रत्येकी ८ आणे हिस्सा आला आहे? | **होकारार्थी** |
| ५. | प्रतिवादी क्र.१ शाबीत करतो का, मयत हौसाबाई, प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांचा वडीलार्जित एकत्र कुंटुंबाचे मिळकतीतील हिस्सा त्याचे व वादीचे लाभात सोडून दिला आहे? | **होकारार्थी** |
| ६. | प्रतिवादी शाबीत करतात का, प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकार न केल्याचे बाधा येते? | **नकारार्थी** |
| ६अ. | प्रतिवादी क्र.४ शाबीत करतो का, वादीने प्रस्तुत दाव्यात घरमिळकती सामील करणे वगळले आहे? | **नकारार्थी** |
| ६ब. | प्रस्तुत दाव्यास वडीलार्जित घरमिळकती सामील न केल्याची बाधा येते? | **नकारार्थी** |
| ६क. | प्रतिवादी क्र.४अ ते ४फ शाबीत करतात का, प्रतिवादी क्र.४ हा दावामिळकत गट क्र.३१८, | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | ७३४/२, ६२८ व ६३१ चा गैरहक्काचे कब्जाने मालक झाला आहे? | |
| ७. | वादी शाबीत करतो का, त्याला दावामिळकतीमध्ये हिस्सा आहे जर निष्कर्ष होकारार्थी असल्यास हिस्सा किती? | **नकारार्थी** |
| ८. | वादी मागणी केलेप्रमाणे दावामिळकतींचे वाटप व पृथक कब्जा मिळणेस पात्र आहे का? | **नकारार्थी** |
| ९. | आदेश व हुकूमनामा काय ? | **दावा खर्चासह नामंजूर केला.** |

## का र ण मि मां सा

२६. वादींतर्फे विधिज्ञ श्री.व्ही.बी.शिंदे यांनी असा युक्तीवाद केला की, दावामिळकती या वादी व प्रतिवादींच्या एकत्र कुंटुंबाच्या मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत. वादी व प्रतिवादींचे अद्याप एकत्र कुटुंब असून त्यांचे एकत्र कुंटुंबाचे शेतजमिनींचे सरसनिरसमानाने वाटप झालेले नाही. दावामिळकतींपैकी काही मिळकती वडीलार्जित आहेत. वडील असतांना सुद्धा प्रतिवादी क्र.१ हा व्यवहारकुशल असल्याने तो कुंटुंबाच्या मिळकतींची सर्व व्यवस्था पाहत होता. वडीलार्जित मिळकतींतून येणारे उत्पन्न कुंटुंबास पुरून उरेल असे होते. अन्य कोणाचे कर्जपाणी नव्हते. प्रतिवादी क्र.१ चे नावे एकत्र कुंटुंबाचे उत्पन्नातून मिळकती खरेदी केली होती. ती मिळकत एकत्र कुंटुंबाची म्हणूनच वहिवाटली जात होती. पुढे बायकांचे पटेना म्हणून प्रतिवादी क्र.१ ने वादीस एकत्र कुंटुंबाचे मिळकतींपैकी काही मिळकती सोईनुसार वहिवाटणेस दिल्या व त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१ चे सोईनुसार पृथक वहिवाटी सुरू होत्या. परंतू त्यांचेत सरसनिरसमानाने वाटप झालेले नव्हते. प्रतिवादी क्र.१ ने एकत्र कुंटुंबाच्या उत्पन्नातून काही मिळकती स्वतःचे नावे व प्रतिवादी क्र.४ चे नावे खरेदी केल्या आहेत परंतू सर्व मिळकती वादी व प्रतिवादी हे एकत्रात वहिवाटीत होते. प्रतिवादी

क्र.१ व ४ यांनी वादीला त्यांचे नावे खरेदी असलेल्या व रेकॉर्डसदरी नोंद असलेल्या मिळकतींमध्ये सामाईकात वहिवाट करणेस हरकत सुरू केली म्हणून वादीने प्रतिवादी क्र.१ व ४ यांना नोटीस देऊन दावामिळकतींचे सरसनिरसमानाने वाटप करून मागितले. त्या नोटीसीस प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी खोटी विधाने करून वाटप करून देण्याचे नाकारले. त्यामुळे दावामिळकतींचे सरसनिरसमानाने वाटप होऊन वादीचा ३/८ हिस्सा पृथक करून मिळावा व दरम्यानचे उत्पन्न मिळावे याकरीता प्रस्तुत दावा दाखल करणे वादीस भाग पडले. वादींनी त्यांचे कथनांचे पुष्ठ्यार्थ कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. वादींनी त्याची बाजू शाबीत केली आहे त्यामुळे वरनमूद कारणांचा विचार करता प्रस्तुत दावा मंजूर होणेस पात्र आहे.

२७. वादींनी त्याचे कथनांचे पुष्ठार्थ खालील न्यायनिर्णय हजर केले आहेत –

**1. Kaliyappa Gounder & others. Vs. Muthuswami Mudaliar. AIR 1987 Madras 24**

The Honorable Madras High Court held that, principles concerning separate enjoyment for sake of convenience is no partition. Deepening of well, lying under ground pipes getting loans on security of portion in once possession are not adequate proof of partition.

**2. Srinivas Krushn Kango Vs. Narayan Devji Kangao. 2009 ALL SCR (OCC)53**

The Honorable Supreme Court of India held that, party alleging self acquisition of certain property. Burden shifts on him to prove that it was acquired without the aid of joint family property.

**3. <u>V.K. Surendra Vs. V.K. Thimmaiah & others. 2013 ALL SCR 1737</u>**

The Honorable Supreme Court of India held that, in suit for partition, the burden of proof of that joint family property or self acquired property, if a coparcener of a joint family claims that properties are his self acquired properties, burden on him to prove the same.

**4. <u>Ramchandra Jyoti Jadhav Kaikadi Vs. Gajendra Nana Gund. 2009 (6) ALL MR 915</u>**

The Honorable Bombay High Court held that, authorities under the Bombay Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, 1947 cannot decide the title of the person.

**5. <u>Shamkalabai Vs. Bhimsingh Kisansingh Chouvan. 2014(5) ABR 84.</u>**

The Honorable Bombay High Court Aurangabad Bench held that, in the case of defendant that property was purchased in the name of plaintiff from joint family income due to pending litigation. Said property was given to defendant in partition. Failure by plaintiff to prove her separate income or that the amount was given to her by her father to purchase suit property. Nothing to show that it was Stridhan of plaintiff. Joint family having nucleus to purchase that property. Property would not be separate property of plaintiff.

वरील न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत दाव्यातील

वस्तुस्थिती या भिन्न असल्याने वरील न्यायनिर्णय प्रस्तुत दाव्यास लागू होत नाही.

२८. प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४ड यांनी लेखी युक्तीवाद (नि.३२१) दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४ड तर्फे विधिज्ञ श्री.एस.टी.पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत दावा वाटप व पृथक कब्जासाठी दाखल केला आहे. दाव्यासोबत परिशिष्टात नमूद असलेल्या मिळकती वादी व प्रतिवादींचे एकत्र कुंटुंबाच्या मालकी वहिवाटीच्या मिळकती असलेबाबत वादींनी कथन केले आहे. वादी व प्रतिवादींचे एकत्र कुंटुंब असल्याचे शाबीत करण्याची जबाबदारी वादींची आहे तसेच परिशिष्टातील मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादींची एकत्रात कब्जेवहिवाट असल्याचे शाबीत करण्याची वादींची जबाबदारी आहे. वादींनी परिशिष्टातील मिळकतींपैकी काही मिळकती वडीलार्जित मालकीच्या असल्याचे नमूद केले असून त्याचा तपशील शाबीत करण्याची जबाबदारी वादींची आहे. प्रतिवादी क्र.१ हा व्यवहारकुशल असल्याचे व तो मिळकतींची सर्व व्यवस्था पाहत होता हे शाबीत करण्याची जबाबदारी वादींची आहे. वडीलार्जित मिळकतींमधील उत्पन्न त्यावेळी पुरेसे होते हे शाबीत करण्याची जबाबदारी वादींची आहे. मारूती हयात असताना एकत्र कुंटुंबाच्या उत्पन्नातून काही मिळकती प्रतिवादी क्र.१ चे नावे खरेदी केल्याचे व त्या मिळकती एकत्र कुंटुंबाची म्हणून वहिवाटली जात असल्याचे पुराव्यानिशी शाबीत करण्याची जबाबदारी वादींची आहे. वादी व प्रतिवादींची आई एकत्रात कुटुंबात मयत झाल्याचे व त्यानंतर प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी खरेदी केलेल्या मिळकतींमधील वादींना सामाईकात वहिवाट करण्यास हरकत करण्याची जबाबदारी वादींची आहे.

२९. वादींनी बायकांचे पटेना म्हणून काही मिळकती सोईनुसार वहिवाटण्यास दिल्याचे दाव्यात स्पष्टपणे नमूद केले आहे त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या सोईनुसार पृथक वहिवाटी सुरू असल्याचे वादीने दाव्यात नमूद केले आहे यावरून वादी व प्रतिवादी क्र.१ हे वहिवाटण्यास दिलेल्या क्षेत्रात पृथक वहिवाटी करीत होते असे शाबीत होते. वादी व प्रतिवादी क्र.१ हे पृथक

वहिवाटी करीत असल्याचे वादींनी कथन केले आहे याचेविरूद्ध जाऊन वादींनी सर्व मिळकतींमधील वादी व प्रतिवादी एकत्रात वहिवाट करीत असल्याचे नमूद केले आहे यावरून वादींनी स्वतः केलेल्या वरील दोन्ही विधानास इस्टॉपल या तरतुदीची बाधा येते.

३०. दाव्यासोबतचे परिशिष्टात मौजे राजापूर येथील मिळकतींचे गट क्रमांक, क्षेत्र, आकार व हिस्सा असा मजकूर नमूद केला आहे त्या परिशिष्टावर वादींची सही नाही व व्हेरिफिकेशन केलेले नाही. तसेच त्यावर वकीलांची सहीसुद्धा नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे प्लीडींग टू बी साईनमधील तरतुदींनुसार दाव्यासोबतचे परिशिष्टावर वादींची अगर वकीलांची सही नसल्याने व व्हेरिफिकेशनही केलेले नसल्याने ते परिशिष्ट दाव्याचा भाग होऊ शकत नाही. त्यामुळे दाव्यासोबतचे परिशिष्ट कायद्याने वाचता येणार नाही. त्यामुळे दावा अर्थहीन होत असून या कारणास्तव फेटाळण्यास पात्र आहे.

३१. दाव्याचे परिशिष्टामध्ये शेतमिळकतींचे गट क्रमांक नमूद केले असून कोणत्याही गटाचे चतुःसिमा नमूद केलेल्या नाहीत. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे तरतुदींनुसार स्थावर मिळकतींच्या स्पष्टतेसाठी पुरेशा ओळखीसाठी चतुःसिमा/बाजू नमूद केलेले नसलेमुळे दाव्यास बाधा येते. त्यामुळे दाव्यासोबतचे परिशिष्ट कायद्याने वाचता येणार नाही याही कारणास्तव दावा फेटाळणेस पात्र आहे.

३२. वादींनी दाखल केलेल्या गट क्र.७३०, ७२८, १८६, १६७, ३१८, ७३४/२, १७४, १७५, ३१९/१०, ३१९/११, ६३१ व १८५ या मिळकतींच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र.१ व ४ यांची नावे नमूद असून ७/१२ पत्रकी वादीचे नाव भोगवटदार मालकीहक्कात किंवा पिकपाणी सदरी वहिवाटदार म्हणून नमूद नाही.

३३. वादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये गट क्र.७३९ व ६२७ या मिळकतींच्या ७/१२ पत्रकी केवळ वादी यशवंत मारूती पाटील याचे एकट्याचे

नाव भोगवटदार मालकीहक्कात नमूद असून या मिळकतींच्या ७/१२ पत्रकी पिकपाणी सदरी जमीन करणार म्हणून केवळ वादी यशवंत याचे खुद्द म्हणून नाव नमूद आहे व सदरील मिळकतींच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र.१ व ४ यांची नावे कोणत्याही रकान्यात नमूद नाहीत. यावरून या दोन्ही मिळकतींमध्ये वादी यशवंत याची एकट्याची पृथक वहिवाट असल्याचे स्पष्ट होते.

३४.　　वादींनी दाखल कलेल्या कागदपत्रांमध्ये गट क्र.६२३, ६२१ व ६५८ या मिळकतींच्या ७/१२ पत्रकी नोंदी पाहता त्या मिळकती, विहीर, विहीरपड व गवतपड अशा प्रकारची वादी व प्रतिवादी क्र.१ तसेच इतर भाऊबंद यांचेत सामाईकात वापरात ठेवल्याचे दिसून येते. वादींनी ७/१२ उता–याव्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही.

३५.　　गट क्र.७३० व ६२८ या मिळकतींचे ७/१२ उतारे पाहिले असता त्यावर प्रतिवादींची नावे नमूद असून भोगवटदार मालक व जमीन करणार म्हणून प्रतिवादींचे नाव नमूद आहे. सदरील उता–यांना सामाईक वहिवाटदार म्हणून वादीचे नाव कोठेही नमूद नाही. गट क्र. १८६, १६७, ३१८, ७३४/२, १७४, १७५, ३१९/१०, ३१९/११, १०३१ व १८५ चे ७/१२ उतारे पाहिले असता त्यावर भोगवटादार व जमीन करणार म्हणून प्रतिवादींच्या नावाची नोंद असून वादीचे नाव कोठेही नमूद नाही.

३६.　　वादींतर्फे श्रीमती लिलावती यशंवत पाटील यांचा तोंडी पुरावा देण्यात आलेला आहे. वादींनी एकत्र कुटुंबाबाबत व शेतमिळकतींचे वाटप झाले नसलेबाबत तिचे तोंडी पुराव्याव्यतिरिक्त कोणाताही पुरावा याकामी दाखल केलेला नाही. वादी व प्रतिवादी यांचेत पृथक वहिवाटी झाल्याचे वादींनी कबूल केल्याने वादीचा दावा फेटाळण्यास पात्र आहे.

३७.　　प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४ड यांनी त्यांचे कथनांचे पुष्ठार्थ खालील न्यायनिर्णय हजर केले आहेत –

**1.　<u>Peddu Reddiar Vs. Kothanda Reddy (AIR 1966 Madras</u>**

**419)**

The Honorable Madras High Court held that, oral partition between co-owners is valid.

2. **Sita Ram Prasad Vs. Mahadev Rai & Ors. (AIR 1980 Patna 254)**

The Honorable Patna High Court held that, presumption of complete partition between family members arises unless contrary is proved.

3. **Hausu Dhondiba Uike & another Vs. Sahebrao Chintaman Salam 2014 (4) ALL MR 802**

The Honorable Bombay High Court held that, presumption of ownership would arise if two conditions are satisfied namely that possession is not prima facie wrongful and title of other contesting party to property is not proved by direct evidence.

4. **Shanmughalam & others Vs. Sarswati and others AIR 1997 Madras 226**

The Honorable Madras High Court held that, in the suit for partition, question of non-joinder of necessary parties can be arise at any time as it goes the root of matter.

5. **Moreshwar Yadavrao Mahajan Vs. Vyanktesh Sita Ram Bhedi 2022 Livelaw (SC) 802**

The Honorable Supreme Court of India held that, if a necessary party is not impleaded, the suit itself is liable to be

dismissed. For being a necessary party the twin test has to be satisfied. The first one is that they must be a right to some relief against such party in respect of the controversies involved in the proceedings. The second one is that no effective decree can be passed in the absence of such a party.

**6. Pratap Singh Vs. Shiv Ram AIR 2020(SC) 1382**

The Honorable Supreme Court of India held that, in the suit for injunction, defendant though admitting ownership of the plaintiff over the suit land but asserting himself to be tenant. No relationship of landlord and tenant mentioned in revenue record. Burden of proving such relationship is on defendant and they cannot be rebutted only by oral evidence. Defendant failed to prove relationship of tenant. Order of High Court dismissing suit by relying upon oral evidence to rebut presumption of truth attached to revenue record is error.

**7. Dingambar Aadhar Patil Vs. Dev Ram Giridhar Patil AIR 1995 (SC) 1728**

The Honorable Supreme Court of India held that, it is not necessary that partition should be effected by registered partition deed.

**8. Mudigavada Gavadappa Shankh Vs. Ramchandra Revgavadha Shankh AIR 1969 (SC) 1076**

The Honorable Supreme Court of India held that, the burden of proving that any particular property is joint family property is therefore in the first instance upon the person who

claims it as a coparcenary property.

**9. <u>Govindram Ganga Ramji Ajmire Vs. Dadarao Ganga Ramji Ajmire 2004 (3) ALL MR 660</u>**

The Honorable Bombay High Court held that, the general rule is that all the joint family properties should be brought into common hotchpotch and then seek partition of the same.

**10. <u>Yendapalli Vyankat Raju Gendapalli Vs. Yedu Kondalu. AIR 1958 A.P. 147</u>**

The Honorable High Court of Andhra Pradesh held that, the existence of joint family property is not a pre-requisite to constitute a joint family. There is no presumption that the property held by a member of a joint Hindu family is joint. It is for the person asserting that any item is joint to prove it to be so.

**11. <u>Bhagyashri & another Vs. Balappa & others. Decided on 13 June, 2023 in Regular First Appeal 81/2017.</u>**

The Honorable High Court of Karnataka, Dharwad Bench observed that, ordinarily a suit for partial partition may not be entertained. When the parties have drought on record by way of pleadings and or other material that apart from the property mentioned by the plaintiff in his plaint there are other properties which could be a subject matter of partition, the court would be entitled to pass a decree even in relation thereto.

वरनमूद न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत खटल्यातील

वस्तुस्थिती या भिन्न असल्याने प्रस्तुतचे न्यायनिर्णय वरील दाव्यास लागू होत नाहीत.

३८. वादींनी त्यांचे कथनांचे पृष्ठार्थ वादी क्र.१/१ श्रीमती लिलावती यशवंत पाटील हिची साक्ष (नि.१५३) लगत नोंदविली आहे. प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४इ यांनी त्यांचे कथनांचे पृष्ठार्थ प्रतिवादी क्र.४क श्री. निवास महादेव पाटील याची साक्ष (नि.७२), साक्षीदार क्र.२ श्री. माणिकसिंगराव आप्पासाहेब कुमठेकर याची साक्ष (नि.२९७) व साक्षीदार क्र.३ श्री. बालाजी भगवान पाटील याची साक्ष (नि.३०७) लगत नोंदविली आहे. वादी व प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४इ यांनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यांवरदेखील भर दिला असून सदरील कागदोपत्री पुराव्यांचा उल्लेख योग्य त्या ठिकाणी घेतला आहे.

३९. लिलावती (वादी सा.क्र.१) हिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.१५३) चे अवलोकन करता असे दिसून येते की, सदरील साक्षीदाराने वादपत्रातील संपूर्ण मजकूर उधृत केला आहे. लिलावती (वादी सा.क्र.१) ने उलटतपासादरम्यान मान्य केले की, तिचे लग्नानंतर साधारण ५ ते ७ वर्षांनी ती तिचे पतीसह विटा येथे राहणेस गेली व तेव्हापासून ती तेथेच राहत आहे. तिचे पतीचे इयत्ता ७वी पर्यंत शिक्षण झाले आहे व तिचे पतीस मोडी लिपी व मराठी भाषा लिहिता वाचता येत होती. तिचे लग्नाचेवेळी तिचा पती शेती करीत होता. लग्नानंतर तिचे पतीस शेती करू दिल्यास शेती करीत होता अथवा हॉटेलमध्ये कामाला जात होता. लग्नाचेवेळी तिचे पतीचे नावे काहीही शेतजमीन नव्हती. तिचे सासरे मारूती यांचे निधनानंतर शेतमिळकतींना तिचे पतीचे नावाची व दिराचे नावाची वारसाने नोंद झाली.

४०. ती स्वतः शेती व्यवसायाचा कारभार पाहून भाजीपाला विक्री करून घरात लागणारे सर्व साहित्य आणणे हे सर्व करीत होती. तिचा मुलगा चंद्रकांत याचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तो केरळ येथील कालिकत येथे गेला होता. प्रताप साळुंखे रा.पारे, खानापूर यांचे कालिकत येथे सोन्या चांदीचे दुकान आहे. तिचा मुलगा रमेश याचे शिक्षण झालेनंतर तो कालिकत येथे गेला असून आजअखेर

तेथेच आहे. ती तिचा जबाब तिचेकरीता व तिचे सर्व मुला–मुलींकरीता देत असून तिचे मुला–मुलींनी तिला त्याबाबत अधिकार लिहून दिलेले नाहीत. ती तिचे मुलांना न विचारता त्यांचेपरस्पर त्यांचेवतीने जबाब देत आहे. तिचे मुलगे चंद्रकांत व रमेश यांना प्रस्तुत दाव्यात कोणतेही स्वारस्य नसल्याने हजर राहिलेले नाहीत. दत्तात्रय याचा मुलगा महादेव तिचे लग्नाचेवेळी चार ते पाच वर्षाचा होता. तिचे नणंदा सोनाबाई व राधाबाई यांचे लग्न तिचे लग्नाचेआधी झालेले आहे.

४१. मारुती मयत झालेनंतर त्याचे दोन मुलांचे नावाची नोंद झाली मारुतीचे नावे एकूण किती क्षेत्र होते याची तिला माहिती नाही. मारुतीचे मृत्युनंतर फेरफार क्र. १११६ ने यशवंत व दत्तात्रय यांचे नावाचे नोंदी झाल्या. सोनाबाई व राधाबाई या दोघींची नावे लागली असा उतारा दाखल केलेला नाही. फेरफार क्र. १११६ बाबत सोनाबाई व राधाबाई यांनी आजअखेर कुठेही तक्रार केलेली नाही. सोनाबाई व राधाबाई यांनी कोर्टात येवून कधीही हिस्सा मागितलेला नाही.

४२. तिने प्रस्तुत दाव्यामध्ये किती मिळकती सामील केल्या आहेत ते तिला सांगता येणार नाही. गट क्र. ७३० चे मालकसदरी व जमीन करणा–याचे नांव "खुद्द" म्हणून दत्तू मारुती पाटील याचे एकट्याचेच नाव नमूद आहे. गट क्र. ६२३ च्या सातबारासदरी जवाहरलाल ज्ञानोबा पाटील वगैरे १३ लोकांची नावे नमूद आहेत. जवाहरलाल ज्ञानोबा पाटील वगैरे १३ लोकांना प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार केलेले नाही. गट क्र. ६२७ चे मालकसदरी व जमीन करणा–याचे नांव "खुद्द" म्हणून यशवंतचे एकट्याचेच नाव नमूद आहे. गट क्र. ६५८ ला यशवंत वगैरे ४ लोकांचे नावाची नोंद आहे. गोविंद बाबूराव पाटील, विठोबा बाबूराव पाटील व पांडूरंग बाबूराव पाटील यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार केलेले नाही. गट क्र. ७३९ चे सातबारा उतारासदरी मालक सदरी व जमीन करणार म्हणून तिचे पतीचे नाव नमूद आहे. गट क्र. ३१९/१० व ३१९/११ या दोन्ही गटाचे सातबारा उतारे तिने दाखल केलेले आहेत व त्यावर दत्तात्रय देव नृसिंहवाडी यांचे नांव मालक म्हणून व वहिवाटदार म्हणून महादेव पाटील यांचे नावाची नोंद आहे. गट क्र. ३१९/१० व ३१९/११ या देवस्थानचे मिळकती आहेत. तिने दत्तात्रय

देवस्थान नृसिंहवाडी या ट्रस्टला प्रस्तुत दाव्यात पक्षकार केलेले नाही. प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी दत्तात्रय देवस्थान नृसिंहवाडी व धर्मादाय आयुक्त यांची परवानगी घेतलेली नाही.

४३. सन १९६२–१९६३ पासून मालक व जमीन करणार म्हणून तिचे पतीचे नाव गट क्र. ६२७ व ७३९ ला आजपर्यंत आहे. सन १९६२–१९६३ पासून गट क्र. ७३० व ६२८ ला कब्जेदार व जमीन करणार म्हणून तिचे दीर दत्तात्रय यांचे नाव आजपर्यंत नमूद आहे. गट क्र. ६२३, ६३१ व ६५८ ला तिचे पती यशवंत व दीर दत्तात्रय यांची नावे समाईक हिस्सेदार म्हणून सन १९६२–१९६३ पासून आजपर्यंत नमूद आहेत. गट क्र. ६२३, ६३१ व ६५८ या मिळकती एकमेकालगत असून त्यामध्ये विहीर, मोट, धाव–पलाण व पाणी जाण्यासाठी पाट आहे व त्या मिळकती सामाईकात आहेत व तशी सामाईकातील नोंद सन १९६२–१९६३ पासून आजपर्यंत आहे. गट क्र. ६२७, ७३९, ७३०, ६२८, ६२३, ६३१ व ६५८ ला तिचे पती व दीर दत्तात्रय यांचे नांव सन १९६२–१९६३ ला नोंद झाले आहे. सन १९६२–१९६३ ला तिचे कुटुंबाची गट क्र. ६२७, ७३९, ७३०, ६२८, ६२३, ६३१ व ६५८ या सात गटांव्यतिरिक्त अन्य कोणतीही मिळकत नव्हती.

४४. तिचे लग्न झाल्यानंतर पाच ते सात वर्षानंतर बायकांचे पटेना म्हणून ती विटा येथे जावुन राहू लागली. ती व तिचा पती कष्ट करुन त्यांचे कुटुंब सांभाळत होते. सन १९६२–१९६३ पासून दत्तात्रयने त्यांना पैसे दिले नाहीत व त्यांनीदेखील दत्तात्रय यास पैसे दिले नाहीत.

४५. तिचे पती किसन सुर्यवंशी व बाळू पाटील यांचे बैलजोडीकडून त्यांचे शेतामधील मेहनत–मशागतीची कामे करुन घेत होते. बांबूडकर वस्तीला लागून गट क्र. ७३९ व ६२७ च्या मिळकती काळ्या मातीचे आहेत. मळयातील तीन एकर व अर्धा एकर अशी मिळून साडेतीन एकरचे क्षेत्र त्यांचे वहिवाटीला होते. मळ्यापासून एक कि.मी. अंतरावर धोंडोळीचे शेत असून सदरचे शेत दगड–धोंडे व मुरमाड असे आहे. धोंडोळीचे शेताचा गट क्र. ७३० असा आहे. गट क्र. ६२७ व

७३९ ची जमीन ती विटा येथे राहून करीत होती. गट क्र. ६२७ व ७३९ ची जमीन करीत असतांना ती सामाईक विहीरीचे पाणी घेत होती.

४६. गोविंद बाबूराव पाटील, पांडूरंग बाबूराव पाटील व विठोबा बाबूराव पाटील व तिचेत राजापूर येथे निम्या-निम्या हिश्याचे गावठाण येथे घर आहे. राजापूर येथे दत्तूचे घराला ग्रामपंचायत मिळकत क्र. ११७ व यशवंतचे घराला ग्रामपंचायत मिळकत क्र. ११६ पडला. दत्तू हा त्याचे घराची व यशवंत त्याचे घराची घरपट्टी भरत होता. सन १९८३ साली राजापूर येथे सिटी सर्वे झाला व त्यांचे घराला सिटी सर्वे क्र. ६६ पडला त्याचे क्षेत्र ७४.५. चौ.मी. आहे. दत्तात्रयचे वाटणीचे घराला दत्तात्रय याचे नांव व यशवंतचे वाटणीचे घराला यशवंतचे नाव अशी सिटी सर्वे रेकॉर्डला नोंद झाली. सि.स.क्र.६६ ते ६८ व ७० या मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट केलेल्या नाहीत. सन १९८८-१९८९ मध्ये तिने राजापूर येथील घरावर स्लॅब टाकला. तिने तिचे व यशवंतचे पैशाने घर बांधले आहे. तिचे घरासाठी यशवंतने मदत देखील केली नाही व हरकतदेखील केली नाही. ते घर बांधत असतांना दत्तू गावातून मळ्यात जावून राहिला. राजापूर गावठाण येथे घर बांधतांना दत्तात्रय याने एक रुपयासुध्दा दिलेला नाही.

४७. राजापूर गावी सन १९६३-१९६४ मध्ये एकत्रीकरण योजनेचा अंमल झाला. नोंदणीकृत हस्तांतरण प्रमाणपत्राबाबत तिने एकत्रीकरण अधिकारी यांचेकडे व या दाव्यात तक्रार केलेली नाही. सन १९६२-१९६३ पासून यशवंतचे नाव गट क्र. ७३९ व ६२७ ला लागले. यशवंतचे मृत्यूनंतर गट क्र. ७३९ व ६२७ तसेच सामाईक तीन मिळकती गट क्र. ६५८, ६३१ व ६२३ यांना फेरफार क्र. ७८९४ ने तिचे व तिचे मुलांची नावे लागली. सन १९६३-१९६४ साली गट क्र. ६२८ व ७३० ला दत्तात्रयचे वाटणीचे म्हणून दत्तात्रयचे नांव सातबारापत्रकी नोंद झाले. नोंदणीकृत हस्तांतरण प्रमाणपत्र (नि.१७८) दत्तात्रयला दिलेबाबत तिने अगर तिचे पतीने एकत्रीकरण अधिकारी यांचेकडे व या दाव्यात तक्रार केलेली नाही. गट क्र. ६२७ व ७३९ या मिळकती यशवंतचे वाटणीला दिल्या होत्या. त्याप्रमाणे सन १९६३-१९६४ सालापासून आजपर्यंत

गट क्र. ७३९ व ६२७ ला यशवंतचे नावाची सातबारापत्रकी नोंद आहे. गट क्र. ६२८ व ७३० या मिळकती दत्तात्रयला वाटणीने दिलेल्या होत्या.

४८. दत्तात्रय हा महादेव पांडूरंग साळुंखे यांचेकडे चाकरीस होता. गट क्र. ३१८ चे सातबारासदरी दत्तात्रयचे नाव आहे. सन १९४५ साली गट क्र. ३१८ चा जुना सर्वे क्र. ५८/१ असा होता. सर्वे क्र. ५८/१ ही मिळकत दत्तात्रयने दिनांक ३१.०३.१९५८ रोजी आनंदा केरु मांगला मुदतखरेदी दिली होती व त्या मुदतखरेदीला यशवंतने हरकत घेतली नव्हती. सन १९६१ मध्ये दत्तात्रयने आनंदा केरु मांगला पैसे परत देवून जमीन सोडवून घेतली. गट क्र. ३१८ ही मिळकत दत्तात्रयचे मालकीची असलेची एकत्रीकरण अधिकारी यांनी निर्णय दिला व एकत्रीकरण अधिकारी यांनी नोंदणीकृत हस्तांतरणपत्र दत्तात्रयला दिले. सन १९६२ पासून गट क्र. ३१८ मध्ये दत्तात्रयची वहिवाट होती. गट क्र. ३१८ मध्ये यशवंतची वहिवाट होती हे दाखविणेसाठी तिने कोणताही कागद दाखल केलेला नाही.

४९. सन १९८२ साली पांडू तुकाराम जाधव याचेकडून दत्तात्रयने गट क्र. १८६ ची मिळकत रक्कम रुपये १७०००/– ला विकत घेतली. दत्तात्रयने गट क्र. १८६ ची मिळकत खरेदी घेतली त्यावेळी यशवंत हा विटा येथे राहणेस होता. खरेदीपत्राप्रमाणे दत्तात्रयचे नावाची नोंद गट क्र. १६७ ला झाली. दिनांक ०८.०४.१९६९ रोजी दत्तात्रयने कोंडाबाई हिंदूराव पाटील हिचेकडून गट क्र. ७३४/२ ची मिळकत र.रु.५००/– ला खरेदी घेतली व त्या खरेदीपत्राप्रमाणे गट क्र. ७३४/२ ला दत्तात्रयचे नावाची नोंद मालक म्हणून झाली.

५०. दिनांक २८.०७.१९८० रोजी महादेव दत्तू पाटीलने गट क्र. १७४ व १७५ या दोन्ही मिळकती महादेव जानू जाधव–पाटील, धोंडीराम जानू जाधव–पाटील, आण्णा चंद्रू जाधव–पाटील, गणू भाऊ जाधव–पाटील यांचेकडून रक्कम रुपये १७०००/– करिता खरेदी घेतले आहेत व खरेदीपत्राआधारे गट क्र. १७४ व १७५ ला महादेव दत्तू पाटीलचे नावाची नोंद झाली. दिनांक २५.०४.१९८० रोजी महादेव दत्तू पाटीलने गट क्र. ३१९/१० च्या मिळकतीचा वहिवाटीचा हक्क

र.रु.५०००/– देवून आकाराम दाजी पाटील याचेकडून खरेदी घेतला. दिनांक १६.०७.१९७९ रोजी महादेव दत्तू पाटील याने गट क्र. ३१९/११ चे वहिवाटीचा हक्क र.रु.८०००/– देवून धोंडीबा आकाराम पाटील याचेकडून खरेदी घेतला. दोन्ही खरेदीपत्राप्रमाणे दोन्ही मिळकतींचे सातबारासदरी महादेव दत्तू पाटील याचे वहिवाटदार म्हणून नाव नोंद झाले. दि.०३.०३.१९८४ रोजी महादेव दत्तू पाटील याने गट क्र. १०३१ ही मिळकत महादेव, लक्ष्मण, यशवंत व किसन नामदेव खरशिंगकर यांच्याकडून र.रु.१७०००/– मात्रला खरेदी घेतली व सदर खरेदीपत्राप्रमाणे महादेव दत्तू पाटील याचे नांव गट क्र. १०३१ ला नोंद झाले. दि.१०.१२.१९८२ रोजी गट क्र. १८५ ची मिळकत महादेव दत्तू पाटील याने माणिक आनंदा जाधव, आनंदा परसू जाधव व आक्कूबाई परसू जाधव यांचेकडून र.रु.१७०००/– ला खरेदी घेतली व सदर खरेदीपत्राप्रमाणे महादेव दत्तू पाटील याचे नांव गट क्र. १८५ ला नोंद झाले. गट क्र. ३१८, ६२८, ६३१, ६५८, ६२३ व ७३४/२ या मिळकतीमध्ये महादेव दत्तू पाटील यांची वहिवाट आहे असा दत्तात्रय मारुती पाटील यांनी तलाठी कार्यालयात अर्ज दिला व सदर अर्जाप्रमाणे वरनमूद गटांना महादेव दत्तू पाटीलचे नाव लागले.

५१. वादपत्र (नि.१) सोबत असलेल्या परिशिष्ठावर यशवंत याची सही अगर अंगठा नाही. तिचे मुलांनी व मुलींनी तिला जबाब देण्यासाठी मुखत्यारपत्र दिलेले नाही. सन १९६२ पासून यशवंत व दत्तात्रय यांचे कुटुंब वेगवेगळे रहात होते. दत्तात्रयने एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातून जमिनी खरेदी केले आहेत असा दाखवणारा कागदोपत्री पुरावे तिने याकामी हजर केलेला नाही. सन १९६२ पासून राजापूर गावठाण येथील घरात तिची सासू हौसाबाई राहत होती. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी खरेदी घेतलेल्या मिळकतींमध्ये यशवंतचे वहिवाटीसाठी प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी हरकती घेतल्या अशी तक्रार पोलीस ठाण्यात वा तलाठी यांचेकडे केलेली नाही. तशी घटना घडलेली नाही त्यामुळे तशी तक्रार केलेली नाही. सरसनिरस मानाने वाटप करुन मिळणेसाठी प्रतिवादी क्र. १ व ४ यांना नोटीस पाठवली असा मजकूर दाव्यात व जबाबात नमूद केला आहे परंतू प्रतिवादी क्र १

व ४ यांना पाठवलेली नोटीस याकामी हजर केलेली नाही. ती शेतातील घरात रहात नव्हती. मारुती हयात असतांना राजापूर येथे त्यांचा वाडा होता. गट क्र. ३१८ मध्ये दत्तात्रयने भूविकास बँकेचे कर्ज घेवून विहीर पाडली व दत्तात्रयने भूविकास बँकेचे कर्ज फेडले.

५२. निवास (प्रतिवादी सा.क्र.१) याने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.२७२) मध्ये प्रतिवादी क्र.४ ची कैफियत (नि.४०) मधील संपूर्ण मजकूर उधृत केला आहे. सदरील साक्षीदाराने उलटतपासादरम्यान मान्य केले की, तो प्रतिवादी क्र.४ चे सर्व वारसांतर्फे जबाब देत आहे. प्रतिवादी क्र.४ चे वारसांनी त्यांचेतर्फे जबाब देण्यास न्यायालयाची परवानगी घेतलेली नाही. एकत्रीकरण व खरेदीपत्र याबाबत त्याचे आईला माहिती आहे. याकामी साक्ष देण्यासाठी त्याने त्याचे आईकडून एकत्रीकरण व खरेदीपत्र याबाबत माहिती घेतली आहे. सन १९६२ साली तोंडी वाटप झाले. तोंडी वाटपाचे लेखीटाकी झालेले नाही. यशवंत याचे विटा येथे हॉटेल होते. यशवंत त्याचे कुंटुंबियासमवेत विटा येथे राहणेस होता. शेतीचे उत्पन्नाशिवाय दत्तात्रय, यशवंत व मारूती यांचे कुंटुंबाला दुसरे उत्पन्नाचे साधन नव्हते. महादेव यांनी तथाकथित मिळकती घेण्यासाठी उसनवार पैसे घेतले असा दाखविणारा कागदोपत्री पुरावा त्याचेकडे नाही. दत्तात्रयचे उत्पन्नाचा कागदोपत्री पुरावा नाही. त्याचे आजोबांचे कैफियतीमध्ये गावांमध्ये घरमिळकती होत्या असे नमूद नाही. त्याचे वडीलांचे कैफियतीमध्ये घरमिळकतीचे क्रमांक, क्षेत्र, चतु:सिमा व वर्णन नमूद नाही. तो त्याचे वडील महादेवचे कैफियतीप्रमाणे साक्ष देत आहे. वादी क्र.१/१ ही अडाणी व निरक्षर आहे.

५३. माणिकसिंगराव कुमठेकर (प्रतिवादी सा.क्र.२) याने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.२९७) मध्ये असे कथन केले आहे की, त्याला मराठीतून मोडी व मोडीतून मराठी भाषा लिहिता वाचता येते. संचालक, पुराभिलेख विभाग यांनी त्याला लिप्यांतराचे प्रमाणपत्र दिले आहे. सदरील लिप्यांतराचे प्रमाणपत्र (नि.२९९) लगत दाखल केले आहे. दि.०६.०३.१९९५ रोजीचे खरेदीपत्राचे लिप्यांतर करून घेण्यासाठी त्याचेकडे प्रतिवादी क्र.४क आला होता. त्याने

सदरील खरेदीपत्राचे लिप्यांतर केले. दि.१८.०१.२०२४ रोजी सदरील खरेदीपत्राचे लिप्यांतर प्रतिज्ञापत्रासह प्रतिवादी क्र.४क ला दिले. सदरील लिप्यांतरास नि.३०० देणेत आली. तसेच मोडी लिपीतील खरेदीपत्र मराठी भाषेत लिप्यांतर करून दिल्याचे प्रमाणपत्रास नि.३०१ देण्यात आली.

५४. बालाजी (प्रतिवादी सा.क्र.३) याने कथन केले की, शंकर कृष्णा पाटील त्याचे चुलते असून प्रतिवादी क्र.४ अ ही शंकर कृष्णा पाटील यांची मुलगी आहे. त्याची सख्खी चुलत बहीण म्हणजेच प्रतिवादी क्र.४अ चा विवाह प्रतिवादी क्र.४ बरोबर झाला होता. त्याचे प्रतिवादी क्र.४ व ४अ यांचेकडे वारंवार जाणे–येणे होते. त्याचे चुलते शंकर पाटील शिक्षक म्हणून नोकरी करीत होते. त्याचे चुलते शंकर हे प्रतिवादी क्र.४ ला गरजेचे वेळी आर्थिक मदत करीत होते. प्रतिवादी क्र.४ हा प्रतापराव महादेव साळुंखे यांचे सिल्व्हर रिफायनरीमध्ये सन १९७४–७५ ते १९८५ पर्यंत नोकरी करीत होते त्यामुळे त्यांना चांगला पगार मिळत होता. प्रतिवादी क्र.४ चे वडील प्रतिवादी क्र.१ ने त्यांचे स्वसंपादित उत्पन्नातून, सासूरवाडीतून केलेल्या आर्थिक मदतीतून व साडू लक्ष्मण गणपती काळे यांनी केलेल्या आर्थिक मदतीतून राजापूर येथील गट क्र.१८६, १६७, ७३४/२ व ३१८ च्या मिळकती खरेदीपत्राने घेतले आहेत. गट क्र.१८६ व १६७ च्या खरेदीपत्राचे नोंदणीवेळी त्याचे चुलते शंकर कृष्णा पाटील हजर होते. नि.२७८ व २७९ कडील खरेदीपत्रावर त्याचे चुलते शंकर पाटील यांची ओळख पटवणार म्हणून सह्या आहेत त्या तो ओळखतो. प्रतिवादी क्र.४ ने नोकरीतून, साठविलेल्या रकमेतून, त्याचे चुलते शंकर पाटील यांनी केलेल्या आर्थिक मदतीतून व प्रतापराव साळुंखे यांच्या सहकार्याने गट क्र.१७४, १७५, १८५, ३१९/१०, ३१९/११ व १०३१ या मिळकती खरेदी घेतले आहेत त्या प्रतिवादी क्र.४ चे स्वसंपादित मालकी वहिवाटीचे मिळकती आहेत. गट क्र.१०३१, १८५ व ११९ चे खरेदीपत्रावेळी त्याचे चुलते शंकर पाटील हे हजर होते व त्यांनी साक्षीदार म्हणून सही केली असून तो त्या सह्या ओळखतो. प्रतापराव महादेव साळुंखे व त्याचे चुलते मयत झाले असून त्यांचा मृत्युदाखला

याकामी हजर केलेला आहे. प्रतिवादी क्र.४ चे साडू लक्ष्मण गणपती काळे यांचा मृत्यू झाला असून त्यांचा देखील मृत्युदाखला याकामी हजर केला आहे. वादी हा विटा येथे कुटुंबासह राहण्यास होता व त्याचे तेथे हॉटेल होते. प्रतिवादी क्र.१ हा राजापूर येथे राहण्यास होता. वादी व प्रतिवादी क्र.१ यांचेत वडीलार्जित मिळकतींचे त्याचे जन्मापूर्वीच वाटप होऊन ते विभक्त राहत होते. वादी व प्रतिवादी क्र.१ हे एकमेकांपासून विभक्त राहून आपापल्या वाटपाचे मिळकती कसून स्वतंत्रपणे कमवित होते. प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी खरेदी केलेल्या शेतमिळकतीमध्ये वादींची केव्हाही कब्जेवहिवाट नव्हती.

५५. बालाजी (प्रतिवादी सा.क्र.३) याने उलटतपासादरम्यान मान्य केले की, शंकर कृष्णा पाटील यांना नक्की किती पेंशन होती हे सांगता येणार नाही. शंकर कृष्णा पाटील यांनी प्रतिवादी क्र.४ ला किती रक्कम कोणत्या बँकेतून कधी काढून दिली याची माहिती नाही. शंकर कृष्णा पाटील अतिशय व्यवहारी होते. शंकर कृष्णा पाटील यांच्या रकमा बँकेतच जमा असायच्या. शंकर कृष्णा पाटील यांनी प्रतिवादी क्र.४ ला रकमा बँकेतूनच काढून दिल्या याबाबत त्याला माहिती नाही. शंकर कृष्णा पाटील यांनी प्रतिवादी क्र.४ ला रक्कम दिलेबाबतचा कायदेशीर कागदोपत्री पुरावा त्याच्याकडे नाही. शंकर कृष्णा पाटील हे प्रतिवादी क्र.४ ला बँकेतून रकमा काढून देत होते असा कागदोपत्री पुरावा आहे याची त्याला माहिती नाही. लक्ष्मण काळे यांचे किती आर्थिक उत्पन्न होते याची त्याला माहिती नाही. लक्ष्मण काळे यांनी प्रतिवादी क्र.४ ला किती व कधी रक्कम दिली याची त्याला वैयक्तिक माहिती नाही. लक्ष्मण काळे व प्रतिवादी क्र.४ यांचेत लेखीटाकी काही झाले याची त्याला माहिती नाही. त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रात नमूद केलेल्या खरेदीपत्रावेळी तो हजर नव्हता. प्रतिवादी क्र.४ ने निश्चित कोणत्या तारेखला जमिनी खरेदी केल्या हे त्याला सांगता येणार नाही. तथाकथित खरेदीपत्रावेळी लक्ष्मण काळे हजर नव्हते. लक्ष्मण काळे यांनी प्रतिवादी क्र.४ ला दिलेल्या रकमेबाबत कागदोपत्री पुरावा त्याने पाहिलेला नाही. प्रतिवादी क्र.४ हा प्रताप साळुंखे यांच्याकडे कामाला होता व प्रताप साळुंखे यांनी प्रतिवादी क्र.४ ला

मोबदला दिला असा त्याच्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. प्रतिवादी क्र.४ हा प्रताप साळुंखे यांच्याकडे कामाला होता असा त्याच्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. प्रतिवादी क्र.४ चा चांगला पगार होता याचे त्याचेकडे रेकॉर्ड नाही.

## मुद्दे क्र.१ ते ८ –

५६. सदरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने विश्लेषणांची पुर्नरावृत्ती टाळणेकरीता सदरील मुददे मी एकत्रित विवेचनाकरीता घेत आहे. वादी, प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४इ यांची कथने, दाखल पुरावे व युक्तीवादांचे बारकाईने अवलोकन केले. प्रस्तुत दावा वाटप, पृथक कब्जा व दरम्यानचे उत्पन्न मिळणेकरीता दाखल केला आहे. वादी, प्रतिवादी क्र.१, प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४इ यांना त्यांचेतील नातेसंबंध मान्य आहेत. प्रतिवादी क्र.१ हा वादी यशवंतचा थोरला भाऊ आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ या वादी यशवंतच्या बहिणी आहेत. प्रतिवादी क्र.४ हा प्रतिवादी क्र.१ चा मुलगा असून वादी यशवंतचा पुतण्या आहे. प्रस्तुत दावा न्यायप्रविष्ठ असताना प्रतिवादी क्र.१, २ व ४ हे मयत झाले असून त्यांचे वारस अभिलेखावर घेणेत आलेले आहेत. प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र.२अ ते २इ, ३, ४ब/१ व ४ब/२ व ५ यांचेविरूद्ध एकतर्फा चालविण्यात आला. केवळ प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र. ४ ने प्रस्तुत दावा आव्हानित केलेला आहे. प्रतिवादी क्र.४अ ने प्रतिवादी क्र.४ ची कैफियत (नि.४०) ही पुरशीस (नि.५८) ने स्वीकारलेली आहे. प्रतिवादी क्र.४क ते ४इ यांनी कैफियत दिलेली नसून केवळ पुरावा दाखल केला आहे.

५७. वादींनी असे कथन केले आहे की, दावामिळकती हया वादी व प्रतिवादींच्या एकत्र कुंटुंबाच्या मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत. वादी व प्रतिवादींचे अद्याप एकत्र कुटुंब असून त्यांचे एकत्र कुंटुंबाचे शेतजमिनींचे सरसनिरसमानाने वाटप झालेले नाही. दावामिळकतींपैकी काही मिळकती वडीलार्जित आहेत. वडील असतांना सुद्धा प्रतिवादी क्र.१ हा व्यवहारकुशल असल्याने तो कुंटुंबाच्या मिळकतींची सर्व व्यवस्था पाहत होता. वडीलार्जित मिळकतींतून येणारे उत्पन्न कुंटुंबास पुरून उरेल असे होते. प्रतिवादी क्र.१ चे नावे

एकत्र कुंटुंबाचे उत्पन्नातून मिळकती खरेदी केली होती. बायकांचे पटेना म्हणून प्रतिवादी क्र.१ ने वादीस एकत्र कुंटुंबाचे मिळकतींपैकी काही मिळकती सोईनुसार वहिवाटणेस दिल्या व त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१ चे सोईनुसार पृथक वहिवाटी सुरू होत्या परंतू त्यांचेत सरसनिरसमानाने वाटप झालेले नव्हते. प्रतिवादी क्र.१ ने एकत्र कुंटुंबाच्या उत्पन्नातून काही मिळकती स्वतःचे नावे व प्रतिवादी क्र.४ चे नावे खरेदी केल्या आहेत परंतू सर्व मिळकती वादी व प्रतिवादी हे एकत्रात वहिवाटीत होते. प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी वादीला त्यांचे नावे खरेदी असलेल्या व रेकॉर्डसदरी नोंद असलेल्या मिळकतींमध्ये सामाईकात वहिवाट करणेस हरकत सुरू केली म्हणून वादीने प्रतिवादी क्र.१ व ४ यांना नोटीस देऊन दावामिळकतींचे सरसनिरसमानाने वाटप करून मागितले. त्या नोटीसीस प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी खोटी विधाने करून वाटप करून देण्याचे नाकारले त्यामुळे दावामिळकतींचे सरसनिरसमानाने वाटप होऊन वादीचा ३/८ हिस्सा पृथक करून मिळावा व दरम्यानचे उत्पन्न मिळावे याकरीता प्रस्तुत दावा दाखल करणे वादीस भाग पडले. प्रस्तुत दाव्याचे काम चालू असतांना प्रतिवादी क्र.१ ने दावामिळकत गट क्र.१८६ ही प्रतिवादी क्र.५ ला खरेदी दिली त्यामुळे प्रस्तुत दावेचे कामी कोणताही तांत्रिक दोष राहू नये म्हणून प्रतिवादी क्र.५ ला सामील केले आहे.

५८. प्रतिवादी क्र.१ ने कैफियत (नि.३९) मध्ये असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादींचे एकत्र कुंटुंब ब–याच वर्षांपासून अस्तित्वात नाही. दावामिळकत गट क्र.३१८ पूर्वीचा सर्वे क्र.५८/१ ही मिळकत वडीलांच्या हयातीत सन १९४५ साली स्वतःचे कमाईने खरेदी केली व त्यावेळेपासून सदरील मिळकत प्रतिवादी क्र.१ हा एकटाच स्वतंत्र मालकीहक्काने कब्जेवहिवाटी करीत आला आहे. सदरील मिळकत प्रतिवादी क्र.१ ची स्वकष्टार्जित व स्वसंपादित स्वतंत्र मालकीची मिळकत आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ चे वडील मारूती कृष्णा पाटील हे सन १९५८ साली मयत झाले. मारूती कृष्णा पाटील यांना वादी व प्रतिवादी क्र.१ हे मुलगे, हौसाबाई ही पत्नी, प्रतिवादी क्र.२ व ३ या

मुली वारस होत्या. मारूतीचे पश्चात पत्नी हौसाबाई, प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी वारसाहिस्सा वादी व प्रतिवादी क्र.१ या बंधूंना सोडून दिला. त्यामुळे वडीलार्जित जमिनीचे रेकॉर्ड ऑफ राईट्सला वादी व प्रतिवादी क्र.१ ची नावे प्रत्येकी ८ आणे हिश्याने दाखल झाली. सन १९६२ चे सुमारास वादी व प्रतिवादी क्र.१ यांनी वडीलार्जित जमिनी म्हणजेच पूर्वीचे सर्वे क्र.१४०/२, १४२/१, १४२/३, १४२/५, १४६/१०, १४२/४, १४६/२ व १४६/६ या मिळकतींचे व घरमिळकतींचे आपसांत वाटप करून घेतले व विहीरीचा वसला व पडजागा सामाईकात ठेवल्या. त्यावेळेपासून वादी व प्रतिवादी क्र.१ यांची प्रत्येकाची ज्याचे त्याचे हिश्यास आलेल्या जमिनी निम्म्या हिश्याने स्वतंत्र वहिवाट सुरू झाली. राजापूर गावी तुकडेबंदी तुकडेजोड कायद्याखाली एकत्रीकरण योजनेचा अंमल सुरू झाला व त्यात सलगतेच्या दृष्टीने नवीन गट तयार करणेत आले. प्रतिवादी क्र.१ चे हिश्यास गेलेल्या जमिनीस म्हणजेच गट क्र.७३० व ६२८ या जमिनींच्या रेकॉर्डला प्रतिवादी क्र.१ चे नाव दाखल झाले. वादीच्या हिश्येस गेलेल्या जमिनीस गट क्र. ७३९ व ६२७ ला वादीचे नाव दाखल झाले व सामाईकातील जमिनींना गट क्र.६३१ व ६५८ देण्यात आला. वडीलांचे पश्चात वडीलार्जित जमिनीचे वाटपानंतर एकत्र कुटुंबच अस्तित्वात राहिले नाही.

५९. दावामिळकत गट क्र.७३४/२ ही ३५ गुंठे जमीन प्रतिवादी क्र.१ ने स्वतःचे उत्पन्नातून सन १९६९ साली कोंडाबाई हिंदूराव पाटील हिचेकडून र.रू.५००/– चे मोबदल्यात खरेदी घेतली व ती जमीन प्रतिवादी क्र.१ च्या स्वतंत्र खरेदी मालकीवहिवाटीची आहे. साठविलेल्या रकमेतून व भरीव रक्कम सासूबाई हिराबाई सुबराव काटकर व आपला साडू लक्ष्मण गणपती काळे यांचेकडून काही रक्कम उसनवार घेऊन दि.१०.१२.१९८२ चे दोन स्वतंत्र खरेदीपत्राने गट क्र.१८६ क्षेत्र ० हे. ३३ आर व गट क्र.१६७ पैकी ८ आणे हिश्याची जमीन क्षेत्र १२ गुंठे अशा दोन जमिनी प्रतिवादी क्र.१ ने खरेदी केल्या. या दोन्हीही जमिनी प्रतिवादी क्र.१ च्या स्वतंत्र मालकी खरेदी वहिवाटीच्या मिळकती आहेत.

६०. त्यानंतर आरफळ धरणासाठी राजापूर येथील ज्यांचेकडे पाच एकरापेक्षा जमीन जास्त आहे त्यांच्या काही जमिनी धरणग्रस्त लोकांसाठी संपादन करणेची योजना होती. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने त्याचे नावावरील गट क्र.३१८, ७३४/२, ६२८ व ६३१ चे मिळकतींचे रेकॉर्ड ऑफ राईट्सला प्रतिवादी क्र.४ चे नाव वर्दी देऊन दाखल केले. त्यावेळेपासून प्रतिवादी क्र.४ हा एकटाच सदरील मिळकती मालकीहक्काने वहिवाटीत आहे. नोकरीच्या पगारातून व साठविलेल्या रकमेतून तसेच श्री. प्रतापशेठ यांच्या साहाय्याने व सासुरवाडीकडून काही आर्थिक मदत मिळवून प्रतिवादी क्र.४ ने दावामिळकत गट क्र.१७५, ३१९/१०, ३१९/११, १०३१ पैकी हिस्सा व गट क्र.१७५ या मिळकती खरेदी केल्या. त्या मिळकती प्रतिवादी क्र.४ चे स्वतंत्र मालकीवहिवाटीच्या मिळकती आहेत व त्यात प्रतिवादी क्र.४ हा स्वतंत्रपणे मालकीहक्काने एकटाच वहिवाट करीत आहे.

६१. प्रतिवादी क्र.४ ने असे कथन केले आहे की, दावामिळकत गट क्र.१७४, १७५, ३१९/१०, ३१९/११ व १०३१ पैकी चार आणे हिस्सा व गट क्र.१८५ या प्रतिवादी क्र. ४ च्या स्वकष्टार्जित व स्वसंपादित स्वतंत्र मालकी कब्जेवहिवाटीच्या आहेत त्यामुळे सदरील मिळकती वाटपास पात्र नाहीत. प्रतिवादी क्र.१ ने गट क्र.३१८, ७३४/२, ६२८ व ६३१ या जमिनींचा वर्दी देऊन प्रतिवादी क्र. ४ चे नाव दाखल करून दिले.

६२. वादी, प्रतिवादी क्र.१, प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४इ यांचे कथनांचे बारकाईने अवलोकन करता त्यांचेतील मुख्य वादविषय असा आहे की, दावामिळकती हया वादी व प्रतिवादींच्या एकत्र कुंटुंबाच्या मिळकती आहेत का? त्यापैकी काही दावामिळकती वडिलार्जित आहेत का? सन १९६२ साली दावामिळकतींचे वादी व प्रतिवादी क्र.१ यांचेत वाटप झाले आहे का? दावामिळकत गट क्र.३१८, ७३४/२, १८६ व १६७ हया प्रतिवादी क्र.१ च्या स्वसंपादित मिळकती आहेत का? दावामिळकत गट क्र.१७४, १७५, १८५, ३१९/१०, ३१९/११ व १०३१ पैकी चार आणे हिस्सा हया प्रतिवादी क्र.४ च्या स्वसंपादित मिळकती आहेत का? प्रतिवादी क्र.४ हा गट क्र.३१८,

७३४/२, ६२८ व ६३१ हया मिळकतींचा प्रतिवादी क्र.१ चे वर्दीवरून मालक झाला आहे का?

६३. वादी, प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४ड यांचेतील मुख्य वादविषयांचे निराकरण करणेसाठी वादी क्र.१/१ चा मे. न्यायालयासमोरील तोंडी पुराव्याचे व वादींनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यांचे बारकाईने अवलोकन केले. वादींनी वादपत्रातील दावामिळकतींचा मजकूर संदिग्धरित्या नमूद केला आहे. वादपत्रातील मजकूर 'दावामिळकती हया वादी व प्रतिवादींच्या एकत्र कुंटुंबाच्या मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत. दावामिळकतींपैकी काही मिळकती वडीलार्जित आहेत. प्रतिवादी क्र.१ चे नावे एकत्र कुंटुंबाचे उत्पन्नातून मिळकती खरेदी केली होती. बायकांचे पटेना म्हणून प्रतिवादी क्र.१ ने वादीस एकत्र कुटुंबाचे मिळकतींपैकी काही मिळकती सोईनुसार वहिवाटणेस दिल्या व त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१ चे सोईनुसार पृथक वहिवाटी सुरू होत्या. प्रतिवादी क्र.१ ने एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून काही मिळकती स्वतःचे नावे व प्रतिवादी क्र.४ चे नावे खरेदी केल्या आहेत परंतू सर्व मिळकती वादी व प्रतिवादी हे एकत्रात वहिवाटीत होते. प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी वादीला त्यांचे नावे खरेदी असलेल्या व रेकॉर्डसदरी नोंद असलेल्या मिळकतींमध्ये सामाईकात वहिवाट करणेस हरकत सुरू केली' अशी कथने केली आहेत.

६४. वादपत्रातील कथनांमध्ये वादींनी कोणत्या दावामिळकती एकत्र कुंटुंबाच्या मिळकती आहेत? कोणत्या दावामिळकती हया वडिलार्जित मिळकती आहेत? कोणत्या दावामिळकती प्रतिवादी क्र.१ ने त्याचे नावे एकत्र कुंटुंबाच्या उत्पन्नातून खरेदी घेतल्या? कोणत्या दावामिळकती प्रतिवादी क्र.४ ने एकत्र कुंटुंबाच्या उत्पन्नातून खरेदी घेतल्या? कोणत्या दावामिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ हे सोईनुसार वहिवाटीत होते? कोणत्या दावामिळकतींमध्ये प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी वादीस हरकत केली? याबाबत कोणतेही स्पष्ट उल्लेख केलेला नाही. वादीने मोघम स्वरुपाचा दावा दाखल केला आहे. दावेसोबत जोडलेल्या परिशिष्ठावर वादी अगर त्याचेतर्फे विद्वान विधिज्ञांची सही नाही तसेच

दावेसोबत जोडलेल्या परिशिष्ठामध्ये देखील दावामिळकतींपैकी एकत्र कुंटुंबाच्या मिळकती कोणत्या, वडिलार्जित मिळकती कोणत्या व प्रतिवादी क्र.१ आणि ४ यांच्या एकत्र कुंटुंबाच्या उत्पन्नातून घेतलेल्या मिळकती कोणत्या याचा कोणताही उल्लेख नाही. दावामिळकतींचे स्वरूप संदिग्ध असून त्याचे स्वरुप योग्यरित्या कथन न केल्याने वादीचा दावा फेटाळणेस पात्र आहे.

६५. याउलट प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४ड यांनी फेरित (नि.१४९) सोबत दाखल केलेले कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, मारूती कृष्णा पाटील हे दि.२२.०१.१९५८ रोजी मयत झालेने त्यांचे नावावरील वडीलार्जित मिळकतीस वादी व प्रतिवादी क्र.१ यांची नावे नमूद झालेबाबत फेरफार क्र.१११६ (नि.१५७) झाला आहे. जुना स.नं.१४६/१० चा ७/१२ (नि.१५८) चे अवलोकन करता प्रतिवादी क्र.१ चे नाव कमी झाल्याचे व वादीचे नाव कब्जेदार म्हणून लागल्याचे दिसून येते. जुना स.नं.१४६/६ व १४२/४ (नि.१५९ व १६०) याचे अवलोकन करता सदरील मिळकतींमध्ये वादी प्रतिवादी व त्यांचे अन्य भावकी यांचेमधील सामाईक विहीर व विहीरपड असलेबाबत नमूद केले आहे.

६६. मे.असिस्टंट कन्सॉलीडेशन ऑफिसर नं.२ सांगली/एकत्रीकरण अधिकारी सांगली यांचेसमोर वादी यशवंत व प्रतिवादी क्र.१ दत्तात्रय यांचा जाब–जबाब दि.१९.०४.१९६१ ची सत्यप्रत (नि.१६१) चे अवलोकन केले. राजापूर गावी एकत्रीकरण योजनेचा अंमल दि.३१.०१.१९६४ रोजी पूर्ण झालेबाबत फेरफार क्र.१७३ (नि.१६२) चे अवलोकन केले. जुना स.नं.१४६/९इ व १४६/९क (नि.१६३ व १६४) चे अवलोकन करता त्यावर वादीचे नाव असल्याचे दिसून येते. जुना स.नं.१४६/२, १४६/९अ व १४६/९ड (नि.१६५, १६६ व १६७) चे अवलोकन करता असे दिसून येते की, सदरील मिळकती प्रतिवादी क्र.१ चे नावे दिल्या असून त्यावर वादीचे नाव नमूद नाही. जुना स.नं. १४०/२अ ची मिळकत वादीला व जुना स.नं.१४०/२ब ची मिळकत प्रतिवादी क्र.१ ला दिलेबाबत फेरफार क्र.१३६२ ची सत्यप्रत (नि.१६८) दाखल

केला आहे. जुना स.नं. १४६/९क व १४६/९इ ची मिळकत वादीला व जुना स.नं. १४६/९अ व १४६/९ क ची मिळकत प्रतिवादी क्र.१ ला दिलेबाबत फेरफार क्र.१६४१ (नि.१६९) दाखल केला आहे. जुना स.नं.१४६/१० ची संपूर्ण मिळकत वादी व प्रतिवादी क्र.१ यांनी आपसात भाऊ वाटपाने वादीला दिलेबाबत फेरफार क्र.१४७९ (नि.१७०) दाखल केला आहे. जुना स.नं.१४०/२ ची मिळकत २ एकर १३ गुंठे क्षेत्र वादीला दिलेबाबत व प्रतिवादी क्र.१ चे नाव कमी झालेबाबतचा ७/१२ उतारा (नि.१७१) दाखल केला आहे.

६७. राजापूर येथील जुना स.नं. ५८/१ ची मिळकत प्रतिवादी क्र.१ दत्तात्रय/दत्ता यांनी हरी सखाराम गोरे कडून दि.०६.०३.१९४५ रोजी खरेदी घेतलेबाबत फेरफार क्र.४८ (नि.१७२) दाखल केला आहे. जुना स.नं.५८/१ चे ७/१२ पत्रकी मालक व वहिवाटदार म्हणून प्रतिवादी क्र.१ यांचे नाव नमूद असलेचा ७/१२ उतारा (नि.१७३) दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.२३६ प्रमाणे कायम केलेबाबत फेरफार (नि.१७४) दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांची खरेदी मालकीची जुना स.नं. ५८/१ ची मिळकत सन १९५८ साली आनंद केरु मांग याला मुदत खरेदी दिलेबाबत फेरफार क्र.११२८ (नि.१७५) दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी जुना स.नं. ५८/१ ची मिळकत सन १९६१ साली आनंदा केरु मांग यांचेकडून पुन्हा सोडवून घेतलेबाबतचा फेरफार क्र.१३५६ (नि.१७६) दाखल केला आहे.

६८. एकत्रीकरण अधिकारी यांनी वादीला दिलेले हस्तांतरण प्रमाणपत्र (नि.१७७) दाखल केले आहे. एकत्रीकरण अधिकारी यांनी प्रतिवादी क्र.१ ला दिलेले हस्तांतरण प्रमाणपत्र (नि.१७८) दाखल केले आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ यांना एकत्रीकरण अधिकारी यांनी दिलेले हस्तांतरण प्रमाणपत्र (नि.१७९) दाखल केले आहे. वादी, प्रतिवादी क्र.१ व बाबूराव कृष्णा पाटील यांना एकत्रीकरण अधिकारी यांनी दिलेले हस्तांतरण प्रमाणपत्र (नि.१८०) दाखल केले आहे. गट क्र.७३० चे ७/१२ उतारे (नि.१८१, १८२ व १८३) चे अवलोकन करता असे दिसून येते की, कब्जेदार सदरी व जमीन करणार म्हणून प्रतिवादी

क्र.१ चे नाव नमूद आहे. प्रतिवादी क्र.१ ने गट क्र. ७३० वर सोसायटीचे कर्ज घेतल्याबाबतचा फेरफार क्र.२१३२ (नि.१८४) दाखल केला आहे.

६९. राजापूर येथील गट क्र.१८६ ची एकूण ० हे. ३३ आर क्षेत्राची मिळकत यातील प्रतिवादी क्र.१ ने पांडू तुकाराम जाधव यांच्याकडून रोख र.रु. १७,०००/- मात्र मोबदला देवून नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी घेतली. सदर खरेदीपत्रासाठीची संपूर्ण रक्कम प्रतिवादी क्र.१ ने नोंदणी अधिकाऱ्यांच्यासमोर रोखीने अदा केल्याचे खरेदीपत्रात नमूद आहे. सदरील खरेदीपत्रावर दत्तात्रय मारुती पाटील व पांडू तुकाराम जाधव यांचा अंगठा आहे. सदरील खरेदीपत्र दुय्यम निबंधक तासगांव कार्यालयात दि.१०.१२.१९८२ रोजी दस्त क्र.३७५२/१९८२ प्रमाणे नोंद केले आहे. सदरील खरेदीपत्र (नि.२७८) लगत दाखल आहे. वरनमूद केलेल्या दि.१०.१२.१९८२ रोजीच्या खरेदीपत्रानुसार प्रतिवादी क्र.१ चे नाव फेरफार क्र.४०७९ (नि.१८५) दाखल केला आहे. वरनमूद केलेल्या ग.क्र.१८६ ला प्रतिवादी क्र.१ चे एकट्याचे नांव कब्जेदार व जमीन करणार म्हणून नमूद असलेला ७/१२ उतारा (नि.१८६ व १८७) लगत दाखल केलेले आहेत.

७०. राजापूर येथील गट क्र.१६७ ची एकूण ० हे. २४ आर क्षेत्रापैकी पूर्वेची आठ आणे हिस्सेची जमीन प्रतिवादी क्र.१ ने विष्णू भुजंगा पोळ याचेकडून रोख र.रु.५०००/- मात्र मोबदला देवून नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी घेतलेबाबतचे खरेदीपत्र (नि.२७९) लगत दाखल आहे. त्यावर प्रतिवादी क्र.१ ची सही व विष्णू भुजंगा पोळ यांचा अंगठा आहे. सदरील खरेदीपत्र दुय्यम निबंधक तासगांव कार्यालयात दि.१०.१२.१९८२ रोजी दस्त क्र.३७५३/१९८२ प्रमाणे नोंद केले आहे. वरनमूद केलेल्या दि.१०.१२.१९८२ रोजीच्या खरेदीपत्रानुसार प्रतिवादी क्र.१ चे नाव गट क्र.१६७ चे ७/१२ पत्रकी नमूद झाल्याचा फेरफार क्र.४०८१ (नि.१८८) दाखल केला आहे. वरनमूद केलेल्या ग.क्र.१६७ चा प्रतिवादी क्र.१ चे एकट्याचे नांव कब्जेदार व जमीन करणार म्हणून नमूद असलेला ७/१२ उतारे (नि.१८९ व १९०) दाखल केलेले आहे.

७१. ग.क्र.६२३ ची मिळकत वादी, प्रतिवादी व त्यांची भावकी यांचेमधील सामाईक विहीर व विहीरपड मिळकत असलेबाबतचा ७/१२ उतारा व एकत्रीकरणाचा उतारा (नि. १९१, १९२, १९३ व १९४) दाखल केले आहेत.

७२. ग.क्र.६२७ ची मिळकत वादी चे नावे असलेबबातचा ७/१२ उतारा (नि.१९५), एकत्रीकरणाचा उतारा (नि.१९६) व ७/१२ उतारा (नि.१९७ व १९८) दाखल केले आहेत. ग.क्र.६३१ ची मिळकत मोट, पाटवण इत्यादी कारणासाठी वादी व प्रतिवादी क्र.१ यांचेमध्ये सामाईकात प्रत्येकी आठ आणे हिस्सेने असलेबबातचा ७/१२ उतारा (नि.१९९), एकत्रीकरणचा उतारा (नि.२००) व ७/१२ उतारा (नि.२०१ व २०२) दाखल केले आहेत.

७३. ग.क्र.६५८ ची मिळकत ही वादी, प्रतिवादी आणि त्यांचे इतर भावकीतील लोकामध्ये विहीर आणि विहीरपड म्हणून सामाईकातील मिळकतीबाबत असलेबबातचा ७/१२ उतारा (नि.२०३, २०४ व २०५) तसेच एकत्रीकरणाचा उतारा (नि.२०६) दाखल केले आहेत.

७४. ग.क्र. ७३९ ची मिळकत वादीचे नावे असलेबाबतचा ७/१२ उतारा (नि.२०७, २०८ व २०९) दाखल केला आहे.

७५. राजापूर येथील गट क्र.१७४ व १७५ च्या पुऱ्या गटाच्या संपूर्ण क्षेत्राच्या मिळकती यातील प्रतिवादी क्र. ४ यांनी महादेव जानू जाधव पाटील, धोंडीराम जानू जाधव पाटील, आण्णा चंदू जाधव पाटील व गणू भाऊ जाधव पाटील यांचेकडून रोख र.रु.१७,०००/– करीता मोबदला देवून नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी घेतल्याबाबतचे खरेदीपत्र (नि.२८०) दाखल केले आहे. वरनमूद केलेल्या दि.२८.०७.१९८० रोजीच्या खरेदीपत्रास अनुसरुन खरेदीदार प्रतिवादी क्र.४ महादेव यांचे नाव फेरफार क्र.२९०९ प्रमाणे ७/१२ पत्रकी गट क्र.१७४ व १७५ चे मिळकतीस नमूद झाले. त्या फेरफार क्र.२९०९ ची सत्यप्रत याकामी (नि.२१०) कडे दाखल केली आहे. वरनमूद केलेल्या ग.क्र.१७४ व १७५ च्या मिळकतीचे सन १९७९–८० ते सन १९८८–८९ या काळातील व १९८९–९० ते १९९८–९९ या कालावधीतील प्रतिवादी क्र.४ महादेव यांचे

एकट्याचे नांव कब्जेदार व जमीन करणार म्हणून नमूद असलेले ७/१२ उतारे (नि.२११ ते २१४) कडे दाखल केलेले आहे.

७६. प्रतिवादी क्र.१ दत्तात्रय यांचे स्वसंपादित खरेदी मालकी वहिवाटीची जुना स.नं.५८/१ चे मिळकतीस एकत्रीकरणानंतर ग.क्र.३१८ पडला असून त्यावर प्रतिवादी क्र.१ यांचे एकट्याचे नांव कब्जेदार व जमीन करणार म्हणून नमूद असून त्याबाबत सन १९६४–६५ ते १९७३–७४ सालातील व सन १९७९–८० ते १९८८–८९ या सालातील व सन १९८९–९० ते सन १९८९–९९ सालातील ७/१२ उतारेंच्या सत्यप्रती याकामी (नि.२१५ ते २१७) प्रमाणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र.१ यांच्या वर्दी अर्जावरुन प्रतिवादी क्र. ४ या त्यांच्या मुलाच्या नावाची नोंद (नि.२१६ व २१७) चे ७/१२ पत्रकी नमूद झालेली आहे.

७७. प्रतिवादी क्र.१ यांचे एकट्याचे नाव नमूद असलेबाबत सन १९६४–६५ ते सन १९७३–७४ सालातील ७/१२ उतारा (नि.२१८) कडे सत्यप्रत म्हणून दाखल केला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांचे वर्दी अर्जावरुन ग.क्र.६२८ चे मिळकतीस प्रतिवादी क्र.४ महादेव याचे नाव नमूद झाले. त्याबाबतचा सन १९७९–८० ते सन १९८८–८९ सालातील व सन १९८९–९० ते सन १९९८–९९ सालातील ७/१२ उतारे (नि.२१९ व २२०) कडे सत्यप्रती म्हणून दाखल केले आहेत.

७८. ग.क्र.७३०, ३१८ व ६२८ या मिळकतींचा एकत्रीतपणे एकत्रीकरणाचा ९/३ व ९/४ चे उताऱ्याची सत्यप्रत (नि.२२१) कडे दाखल केलेली आहे. राजापूर येथील गट क्र. ७३४/२ ची एकूण ० हे. ३४ गुंठे क्षेत्राची पुऱ्या गटाची मिळकत यातील प्रतिवादी क्र.१ दत्तात्रय यांनी पूर्वहक्कदार कोंडाबाई हिंदूराव पाटील यांच्याकडून रोख र.रु.५००/– मात्र मोबदला देवून नोंद खरेदीपत्राने खरेदी घेतली. सदर खरेदीपत्रासाठीची संपूर्ण रक्कम दत्तात्रय यांनी खरेदीपत्राने अदा केली. ते खरेदीपत्र दत्तात्रय मारुती पाटील यांनी नोंदणीसाठी हजर केलेबाबत त्या खरेदीपत्राच्या पान नं.१ वर सही आहे. ते खरेदीपत्र कोंडाबाई

हिंदूराव पाटील यांनी लिहून दिले म्हणून दस्तातील मजकूराच्या शेवटी पान नं.३ वर व ४ वर त्यांचा अंगठा केलेला आहे. ते खरेदीपत्र दुय्यम निबंधक तासगांव कार्यालयात दि.०८.०४.१९६९ रोजी दस्त क्र. ४६८४/१९६९ प्रमाणे नोंद केले आहे. वरनमूद ग.क्र. ७३४/२ या मिळकतीचा एकत्रीकरणाबाबतचा ९/३ व ९/४ चे उताऱ्याची सत्यप्रत याकामी (नि.२२२) कडे दाखल केलेली आहे. वरनमूद केलेल्या ग.क्र. ७३४/२ च्या मिळकतीचा सन १९७९–८० ते सन १९८८–८९ या काळातील व १९८९–९० ते १९९८–९९ या कालावधीतील प्रतिवादी क्र. ४ महादेव यांचे नाव दत्तात्रय यांचे वर्दी अर्जाप्रमाणे फेरफार क्र.२४९७ प्रमाणे नमूद असलेचा व त्यांचे नाव कब्जेदार व जमीन करणार म्हणून नमूद असलेले ७/१२ उतारे (नि.२२३ व २२४) कडे दाखल केलेले आहे.

७९. राजापूर येथील गट क्र. ३१९/१० ची एकूण ० हे. १४ आर क्षेत्राची मिळकत यातील प्रतिवादी क्र.४ महादेव यांनी पूर्वहक्कदार आकाराम दाजी पाटील यांच्याकडून रोख र.रु. ५०००/– मात्र मोबदला देवून नोंद खरेदीपत्राने खरेदी घेतली. सदर खरेदीपत्रासाठीची संपूर्ण रक्कम महादेव यांनी रोखीने अदा केली. तसे त्या खरेदीपत्रात नमूद आहे. ते खरेदीपत्र आकाराम दाजी पाटील यांनी लिहून दिले म्हणून दस्तातील मजकूराच्या शेवटी पान नं.४ वर व ५ वर त्यांच्या सह्या व अंगठा केलेला आहे. ते खरेदीपत्र दुय्यम निबंधक तासगांव कार्यालयात दि.२५.०४.१९८० रोजी दस्त क्र.१६०३/१९८० प्रमाणे नोंद केले आहे. वरनमूद केलेल्या ग.क्र.३१९/१० च्या मिळकतीचा सन १९७९–८० ते सन १९८८–८९ या काळातील व १९८९–९० ते १९९८–९९ या कालावधीतील प्रतिवादी क्र.४ महादेव यांचे एकट्याचे नांव कब्जेदार व जमीन करणार म्हणून नमूद असलेले ७/१२ उतारे (नि.२२५ व २२६) कडे दाखल केलेले आहे.

८०. राजापूर येथील गट क्र.३१९/११ ची एकूण ० हे.२० आर क्षेत्राची मिळकत यातील प्रतिवादी क्र.४ महादेव यांनी पूर्वहक्कदार धोंडीबा आकाराम पाटील यांच्याकडून रोख र.रु. ८०००/– मात्र मोबदला देवून नोंद खरेदीपत्राने खरेदी घेतली. सदर खरेदीपत्रासाठीची संपूर्ण रक्कम महादेव यांनी अदा केली. तसे

त्या खरेदीपत्रात नमूद आहे. ते खरेदीपत्र महादेव यांनी नोंदणीस हजर केलेबाबत त्या खरेदीपत्राच्या पान नं.१ वर सही आहे. ते खरेदीपत्र धोंडीबा आकाराम पाटील यांनी लिहून दिले म्हणून व आकाराम दाजी पाटील मान्यता देणार म्हणून दस्तातील मजकूराच्या शेवटी पान नं.५ वर व ६ वर त्यांच्या सह्या व अंगठे केलेले आहेत. ते खरेदीपत्र दुय्यम निबंधक तासगांव कार्यालयात दि.१६.०७.१९७९ रोजी दस्त क्र.२४२९/१९७९ प्रमाणे नोंद केले आहे. वरनमूद केलेल्या ग.क्र.३१९/१० व ३१९/११ चे मिळकतीचा एकत्रीकरणाचा ९/३ व ९/४ चे उताऱ्याची सत्यप्रत याकामी (नि.२२७) कडे दाखल केलेली आहे. वरनमूद केलेल्या ग.क्र. ३१९/११ च्या मिळकतीचा सन १९७९-८० ते सन १९८८-८९ या काळातील व १९८९-९० ते १९९८-९९ या कालावधीतील प्रतिवादी क्र. ४ महादेव यांचे एकट्याचे नांव कब्जेदार व जमीन करणार म्हणून नमूद असलेले ७/१२ उतारे (नि.२२८ व २२९) कडे दाखल केलेले आहे.

८१. राजापूर येथील गट क्र.१०३१ ची एकूण २ हे. ८३ आर क्षेत्राची मिळकत असून त्यापैकी ० हे. ८६ आर क्षेत्राची मिळकत यातील प्रतिवादी क्र.४ महादेव यांनी पूर्वहक्कदार महादेव नामदेव खरशिंगकर, लक्ष्मण नामदेव खरशिंगकर, किसन नामदेव खरशिंगकर व यशवंत नामदेव खरशिंगकर यांच्याकडून रोख र.रु.१७०००/- मात्र मोबदला देवून नोंद खरेदीपत्राने खरेदी घेतली. सदर खरेदीपत्रासाठीची संपूर्ण रक्कम महादेव यांनी अदा केली तसे त्या खरेदीपत्रात नमूद आहे. ते खरेदीपत्र महादेव दत्तात्रय पाटील यांनी नोंदणीस हजर केलेबाबत त्या खरेदीपत्राच्या पान नं.१ वर सही आहे. ते खरेदीपत्र वरनमूद केलेल्या महादेव नामदेव खरशिंगकर, इ. ४ यांनी लिहून दिले म्हणून दस्तातील मजकूराच्या शेवटी पान नं.६ वर व ७ वर त्यांचे सह्या व अंगठे केलेले आहेत. ते खरेदीपत्र दुय्यम निबंधक तासगांव कार्यालयात दि.०३.०३.१९८४ रोजी दस्त क्र.६८८/१९८४ प्रमाणे नोंद केले आहे. वरनमूद केलेल्या दि.०३.०३.१९८४ रोजीच्या खरेदीपत्रास अनुसरुन खरेदीदार प्रतिवादी क्र.४ महादेव यांचे नाव फेरफार

क्र.४६९३ प्रमाणे ७/१२ पत्रकी गट क्र.१०३१ चे मिळकतीस नमूद झाले. या फेरफार क्र.४६९३ ची सत्यप्रत याकामी (नि.२३०) कडे दाखल केली आहे. वरनमूद केलेल्या ग.क्र.१०३१ च्या मिळकतीचा सन १९७९–८० ते सन १९८८–८९ या काळातील व १९८९–९० ते १९९२–९३ या कालावधीतील प्रतिवादी क्र.४ महादेव यांचे नांव कब्जेदार व जमीन करणार म्हणून नमूद असलेले ७/१२ उतारे (नि.२३१ व २३२) कडे दाखल केलेले आहे.

८२. राजापूर येथील गट क्र.१८५ ची एकूण ० हे. ३० आर क्षेत्राची मिळकत यातील प्रतिवादी क्र.४ महादेव यांनी पूर्वहक्कदार माणिक आनंदा जाधव व इतर यांच्याकडून रोख र.रु. १७०००/– मात्र मोबदला देवून नोंद खरेदीपत्राने खरेदी घेतली. सदर खरेदीपत्रासाठीची संपूर्ण रक्कम महादेव यांनी अदा केली तसे त्या खरेदीपत्रात नमूद आहे. ते खरेदीपत्र महादेव दत्तात्रय पाटील यांनी नोंदणीस हजर केलेबाबत त्या खरेदीपत्राच्या पान नं.१ वर सही आहे. ते खरेदीपत्र वरनमूद केलेल्या माणिक आनंदा जाधव इ. यांनी लिहून दिले म्हणून दस्तातील मजकूराच्या शेवटी पान नं.७ वर व ८ वर त्यांचे अंगठे केलेले आहेत. ते खरेदीपत्र दुय्यम निबंधक तासगांव कार्यालयात दि.१०.१२.१९८२ रोजी दस्त क्र. ३७५१/१९८२ प्रमाणे नोंद केले आहे. त्या खरेदीपत्रातील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. ते खरेदीपत्र सुमारे ३० वर्षापूर्वी नोंदलेले आहे. वरनमूद केलेल्या दि.१०.१२.१९८२ रोजीच्या खरेदीपत्रास अनुसरुन खरेदीदार प्रतिवादी क्र.४ महादेव यांचे नाव फेरफार क्र.४०७८ प्रमाणे ७/१२ पत्रकी गट क्र.१८५ चे मिळकतीस नमूद झाले. या फेरफार क्र.४०७८ ची सत्यप्रत याकामी (नि.२३३) कडे दाखल केली आहे. वरनमूद केलेल्या ग.क्र.१८५ च्या मिळकतीचा सन १९७९–८० ते सन १९८८–८९ या काळातील व १९८९–९० ते १९९८–९९ या कालावधीतील प्रतिवादी क्र.४ महादेव यांचे नांव कब्जेदार व जमीन करणार म्हणून नमूद असलेले ७/१२ उतारे (नि.२३४ व २३५) कडे दाखल केलेले आहेत.

८३. गट क्र. ३१८, ६२८, ६३१, ६५८, ६२३ व ७३४/२ या

दत्तात्रय यांचे नावावरील मिळकती प्रतिवादी क्र.४ महादेव याचे कब्जेवहिवाटीस असल्याने दत्तात्रय यांनी त्यांचे नाव कमी करुन मुलगा महादेव–प्रतिवादी क्र.४ यांचे नाव नमूद करण्यास दिलेल्या वर्दी अर्जाप्रमाणे सन १९७६ साली फेरफार क्र.२४९७ चे मंजूरीने दत्तात्रय यांचे नाव कमी होवून प्रतिवादी क्र.४ महादेव यांचे नाव नमूद झालेचा फेरफार उतारा याकामी (नि.२३६) कडे दाखल केला आहे.

८४. राजापूर येथील जुना स.नं. ५८/१ त्याचाच एकत्रीकरणानंतरचा ग.क्र. ३१८ ची मिळकत प्रतिवादी क्र.१ दत्तात्रय यांनी पूर्वहक्कदार हरी सखाराम गोरे यांच्याकडून दि.०६.०३.१९४५ रोजी खरेदी घेतलेचे मोडी लिपीतील खरेदीपत्राची दुय्यम निबंधक कार्यालयातील सत्यप्रत याकामी फेरिस्त सोबत दाखल केलेली असून त्यास (नि.२५१) देणेत आली आहे.

८५. प्रतिवादी क्र.४अ, ४क ते ४इ यांनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरून दावामिळकती या वादी व प्रतिवादींच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकती नाहीत असे शाबीत होते त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविते. प्रतिवादी क्र.१ ने दावामिळकत गट क्र.१८६, १६७, ३१८ व ७३४/२ ही मिळकत त्याची स्वसंपादित मिळकत असल्याचे शाबीत केल्याने मी मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविते. प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी दावामिळकत गट क्र.१७४, १७५, १८५, ३१९/१०, ३१९/११ व १०३१ या प्रतिवादी क्र.४ च्या स्वसंपादित मिळकती असल्याचे शाबीत केल्याने मी मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविते. प्रतिवादी क्र.१ ने शाबीत केले आहे की, सन १९६२ मध्ये वादी व प्रतिवादींच्या वडीलार्जित मिळकतींचे वाटप झाले असून, त्यांची आई हौसाबाई व बहिणी प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी त्यांचा हिस्सा सोडून दिलेला आहे. प्रतिवादी क्र.२ व तिचे वारस तसेच प्रतिवादी क्र.३ यांनी प्रस्तुत दावा आव्हानित केलेला नाही. प्रतिवादी क्र.२, तिचे वारस व प्रतिवदी क्र. ३ यांचेविरूद्ध प्रस्तुत दावा एकतर्फा चालविण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२, तिचे वारस व प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांचा हिस्सा वादी व प्रतिवादी क्र.१ च्या लाभात सोडल्याचे अप्रत्यक्षरित्या मान्य केलेले आहे. प्रतिवादी क्र.१ ने सन १९६२

साली वादी व त्याचे वडीलार्जित मिळकतींचे वाटप झाल्याचे व आई व बहिणींनी त्यांचे लाभात हिस्सा सोडल्याचे शाबीत केल्याने मी मुद्दा क्र.४ व ५ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविते. वादी व प्रतिवादी क्र.१ यांचेतील वाटप शाबीत झालेले आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी दोघांनीही कोणत्याही घरमिळकती याकामी सामील करणेबाबत त्यांचा तपशील दिलेला नाही. दावामिळकत ३१८, ७३४/२, ६२८ व ६३१ या मिळकती प्रतिवादी क्र.४ च्या स्वसंपादित मिळकती असल्याचे शाबीत झाले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. ६, ६अ, ६ब, ६क, ७ व ८ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविते.

८६. वरील विवेचनावरून सन १९६२ मध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ यांचेत वडीलार्जित मिळकतींचे वाटप झाल्याचे शाबीत झाले आहे. सदरील वाटपात वादीला गट क्र. ७३९ व ६२७ च्या मिळकती देण्यात आल्या. प्रतिवादी क्र.१ ला गट क्र.७३० व ६२८ या मिळकती देण्यात आल्या. वादी व प्रतिवादी क्र.१ तसेच इतर सहहिस्सेदारांच्या गट क्र.६२३, ६३१ व ६५८ च्या मिळकती सामाईकात ठेवण्यात आल्या असे शाबीत होते. तसेच गट क्र.३१८, ७३४/२, १६७ व १८६ या मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या स्वसंपादित मिळकती असल्याचे शाबीत होते. तसेच गट क्र.१७४, १७५, १८५, ३१९/१०, ३१९/११ व १०३१ पैकी ४ आणे हिस्सा या मिळकती प्रतिवादी क्र. ४ च्या स्वसंपादित मिळकती असल्याचे शाबीत होते. प्रतिवादी क्र.१ चे वर्दीनुसार गट क्र.३१८, ७३४/२, ६२८ व ६३१ ला प्रतिवादी क्र.४ चे नाव नोंद झाल्याचे शाबीत होते. वादी व प्रतिवादी क्र.१ यांचेत वडीलार्जित मिळकतींचे वाटप झाल्याचे शाबीत झाल्याने व प्रतिवादी क्र.१ व ४ यांच्या स्वसंपादित मिळकती असल्याचे शाबीत झाल्याने प्रस्तुत दावा खर्चासह फेटाळण्यास पात्र आहे.

**<u>मुद्दा क्र.९</u> –**

८७. वरनमूद कारणांचा विचार करुन मी मुद्दा क्र.१ ते ८ चे निष्कर्ष वरीलप्रमाणे नोंदविले असून मुद्दा क्र.९ चे निष्कर्षाकरिता खालील आदेश पारीत करीत आहे –

## <u>आदेश</u>

१. दावा खर्चासह नामंजूर केला.

२. येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

BHANUPRIYA RAHUL AVACHARI DURGAWADE
Digitally signed by BHANUPRIYA RAHUL AVACHARI DURGAWADE
Date: 2026.08.19 19:07:02 +0530

ठिकाण – तासगांव **(श्रीमती बी.आर.आवचारी दुर्गवडे)**
दिनांक – १७.०८.२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, तासगांव

## Certificate

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment/order;

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Shri.M.A.Narale. |
| Name of Court | : | Civil Judge Jr.Dn.,<br>Tasgaon. |
| Date | : | 17.08.2026 |
| Judgment signed by the Presiding officer on | : | 19.08.2026 |
| Judgment uploaded on | : | 19.08.2026 |